



वर्ष ५७ वे । अंक २६२ वा । पाने ६ । किंमत २ रुपये

दैनिक **सत्यप्रभा**

बातम्यांसोबत विचार देणारे

गुरुवार, दि. १० एप्रिल २०२५

PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026

https://epaper.satyaprabha.com/admin

dainiksatyaprabha2015@gmail.com

*नवी दिल्ली : आधार कार्डचा वापर करणे सोपे व्हावे आणि आधार कार्डचा वापर वाढवण्यासाठी केंद्र सरकारने नवे फीचर लाँच केले आहे. केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. फेस आयडी ऑथेंटिकेशन फीचरसह यूआयडीएआयने ॲप लाँच केले आहे. आता या ॲपमुळे विमानतळ, हॉटेलमध्ये आधारची सॉफ्ट किंवा हार्डकॉपी द्यावी लागणार नाही. आधारची गरज पडल्यास क्यूआर कोड आणि फेस आयडीद्वारे पडताळणी केली जाईल. या ॲपमुळे सुरक्षा आणि गोपनीयतेसाठी आर्टिफिशअल इंटेलिजन्सची मदत घेतली जात आहे. फेस आयडी ऑथेंटिकेशनमुळे फक्त चेहऱ्याच्या आधारे पडताळणी केली जाईल. यामुळे यूपीआय पेमेंट प्रक्रिया सोपी होईल.*

## संक्षिप्त न्यूज

### प्रशांत कोरटकरला जामीन, शुक्रवारी सुटका

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अपशब्द आणि इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी दिल्याप्रकरणी अटक केल्यानंतर न्यायालयीन कोठडीत असलेल्या प्रशांत कोरटकरला जामीन मिळाला आहे. कोल्हापूर कोर्टाने त्याला जामीन दिला असला तरी कोरटकरची लगेच तुरुंगातून सुटका होण्याची शक्यता कमी आहे, असे सांगितले जात आहे. तुरुंगाबाहेर येण्यास त्याला अजून दोन दिवस तरी लागतील, असेही सांगितले जाते. कोर्टात त्याच्या जामिनाची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. आज ती पूर्ण होण्याची शक्यता कमी आहे. तसेच गुरुवारी महावीर जयंतीमुळे सुट्टी आहे. त्यामुळे आज प्रक्रिया पूर्ण झाली नाही तर, त्याची सुटका शुक्रवारवर जाऊ शकते.

### जम्मू-काश्मीर विधानसभेत आमदारांमध्ये हाणामारी

**श्रीनगर :** वक्फ (सुधारित) कायदा लागू झाल्यानंतर जम्मू आणि काश्मीर विधानसभेत सलग तीन दिवसांपासून त्यावरून सत्ताधारी विरुद्ध विरोधक असा संघर्ष सुरू आहे. बुधवारी तर भाजपा आणि आम आदमी पक्षाच्या आमदारांमध्ये हाणामारी झाली. त्यामुळे विधानसभा आखाडा बनल्याचे चित्र दिसत होते. सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्सकडून वक्फ कायद्यावर चर्चेची मागणी केली जात आहे. यादरम्यान सभागृह प्रवेशद्वारावर भाजपा आणि आपचे आमदार आमनेसामने आले आणि जोरदार धक्काबुक्की झाली. विधानसभेत हिंदूंबाबत वादग्रस्त विधान केल्याचा आरोप भाजपा आमदारांनी आपच्या आमदारांवर केला आहे.

### तापमानाचा उद्रेक! पारा ४५ अंशावर

**पुणे :** हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार राज्यातील अनेक भागात तापमानाचा उद्रेक झाला आहे. जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यात तापमानाचा पारा ४५ अंशांवर पोहोचला आहे. राज्यातील हे सर्वाधिक तापमान असल्याचे मानले जात आहे. तर अजूनही दोन दिवस उष्णतेची लाट अशाच पद्धतीने कायम राहणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे. विदर्भातील अकोला शहराचे तापमान ४४ अंशांच्या वर आहे. तर नागपूरमध्ये देखील पारा ४२ अंश सेल्सिअसच्या घरात आहे.

### महावीर जयंतीनिमित्त राज्यपालांच्या शुभेच्छा

**मुंबई :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यातील जनतेला भगवान महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. महावीर जयंतीचा दिवस तीर्थंकर भगवान महावीरांचे जीवनकार्य तसेच त्यांच्या अहिंसा, त्याग, क्षमा, जीवदया व अनेकांतवादाच्या शिकवणीचे स्मरण करून देतो. महावीर जयंतीनिमित्त राज्यातील सर्व लोकांना, विशेषतः जैन बंधू-भगिनींना हार्दिक शुभेच्छा देतो, असे राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

### खा. सुप्रिया सुळे यांचे उपोषण अखेर मागे

**पुणे :** बारामती मतदारसंघातील रस्त्याच्या कामासाठी खा. सुप्रिया सुळे चांगल्याच आक्रमक झाल्या होत्या. खा. सुप्रिया सुळे यांनी बनेश्वर गावकऱ्यांसोबत आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु केले होते. दरम्यान, प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर खा. सुप्रिया सुळे यांनी उपोषण मागे घेतले. दोन मे रोजी रस्ता काम सुरू करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिल्याचे खा. सुळे म्हणाल्या.

### मुलीच्या उपचारासाठी अवघ्या दोन तासांत मदत

**मुंबई :** सिंदखेडराजा येथे रसवंतीच्या मशिनमध्ये केस अडकून जखमी झालेल्या १६ वर्षीय मुलीच्या उपचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदशीलतेमुळे अवघ्या दोन तासात एक लाख रुपयांची मदत मिळाली. वेळीच मदत मिळाल्याने मुलीच्या आईने मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. या घटनेची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षापर्यंत पोहोचली. मुलीच्या कुटुंबाची हलाखीची परिस्थिती आणि घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कक्षाने दोन तासांत एक लाखांची मदत मंजूर केली.

### अजित डोवाल-एस. जयशंकर यांनी घेतली अमित शहांची भेट

# तहव्वूर राणाचे प्रत्यार्पण; आज भारतात आणणार

## अमेरिकेतून विशेष विमान रवाना : दिल्लीतील तिहारमध्ये ठेवणार

**नवी दिल्ली, दि. ९ :** मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणाला घेऊन अमेरिकेतून एक विशेष विमान भारतीय वेळेनुसार आज सायंकाळी सात वाजून १० मिनिटांनी रवाना झाले. त्यानुसार गुरुवारी (दि. १०) सकाळी तो भारतात येण्याची शक्यता आहे. दिल्लीत आल्यानंतर त्याचा ताबा राष्ट्रीय तपास संस्थेकडे (एआयए) असेल. त्यामुळे या काळात त्याचा मुक्काम दिल्लीच्या तिहार तुरुंगात असेल, अशी माहिती मिळत आहे. मुंबईतील हल्ल्यातील त्याचा सहभाग आणि अन्य दहशतवादी संघटना, आयएसआयशी संबंध याची चौकशी या दरम्यान केली जाईल. तहव्वूर राणाच्या भारतात प्रत्यार्पणाला स्थगिती देण्याबाबत अमेरिकेच्या *(पान दोनवर)*

### दिल्लीत सतर्कता

तहव्वूर राणाला भारतात आणण्याच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील नॉर्थ ब्लॉक येथे असलेल्या गृह मंत्रालयाच्या कार्यालयात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची आज बैठक पार पडली. या बैठकीत राणाचे प्रत्यार्पण आणि त्यासंदर्भातील राजकीय परिणामांबाबत चर्चा करण्यात आल्याचे सांगितले जाते.



### भारतात आल्यावर काय होणार?

तहव्वुर राणाला भारतात आणल्यानंतर पटियाला हाऊस येथील राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या कोर्टात हजर करण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यावेळी कोर्टात एनआयए त्याच्या चौकशीसाठी कोठडी मागू शकते. त्यामुळे एनआयएचे मुख्यालय आणि तिहार तुरुंगातील सुरक्षा कडेकोट करण्यात आली आहे.

# गृहसह इतर कर्ज स्वस्त होणार

## आरबीआयकडून रेपोदरात कपात : धास्तावलेल्या गुंतवणूकदारांना दिलासा

**मुंबई, दि. ९ :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हट्टाला पेटत सुरु केलेल्या रेसिप्रोकल टॅरिफच्या आक्रमक अंमलबजावणीमुळे भारतीय शेअर बाजारात हाहाकार उडालेला असताना आरबीआयच्या द्वैमासिक पतधोरण समितीच्या बुधवारी झालेल्या बैठकीत रेपोदरात २५ बेसिस पॉईंटची कपात करण्यात आली. आता रेपोदर ६ टक्क्यांवर आला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी याबाबतची घोषणा केली.

फेब्रुवारीत महागाई दर ३.६१ टक्क्यांवर घसरला आहे. तर हाच दर जानेवारी महिन्यात ४.२६ टक्के इतका होता. त्यामुळे रेपोदरात कपात होईल, अशी अपेक्षा होती. ही अपेक्षा खरी ठरल्याने सामान्य गुंतवणुकदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. शिवाय गृह आणि इतर कर्जाचे हप्ते (ईएमआय) कमी होऊन सामान्य नागरिकांना फायदा होणार आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा *(पान दोनवर)*



### आरबीआयकडे पुरेसा परकीय चलन साठा

जागतिक व्यापार युद्ध आणि इतर बाजारपेठांमध्ये चलनातील व्यापक बदल होत असताना रुपया बराच स्थिर आहे. गरज पडल्यास रुपयावरील कोणताही दबाव हाताळण्यासाठी आरबीआयकडे पुरेसा परकीय चलन साठा आहे, असे संजय मल्होत्रा यांनी स्पष्ट केले.

### जीडीपी वाढीचा अंदाज घटवला

आरबीआयनेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील जीडीपीच्या वाढीचा अंदाज ६.७ टक्क्यांवरुन घटवून ६.५ टक्के केला आहे. टॅरिफ वॉरसारख्या समस्यांमुळे निर्माण होणाऱ्या अनिश्चिततांचा दाखला देऊन मल्होत्रा म्हणाले, की टॅरिफ संदर्भातील पावलांमुळे आर्थिक अनिश्चितता आणि महागाईची भीती निर्माण झाली आहे. पतधोरण देशांतर्गत विकास पाहून ठरवले जाईल. ज्यामुळे विकासाच्या वेगाला मदत मिळेल. याशिवाय महागाईबाबत सतर्क राहावे लागेल, असे म्हलोत्रा म्हणाले.

### संगम अर्बनच्या वर्धापन दिनी खा. अशोकराव चव्हाण यांचे प्रतिपादन

# ग्राहकांचे हित व बँकेची प्रगती याचा 'संगम' साधा

**नांदेड, दि. ९ :** एखादी संस्था चालवत असताना त्यामध्ये त्या संस्थेतील सभासदांचे हित जोपासतानाच संस्थेला प्रगतीपथावर नेण्याची जबाबदारी संचालक मंडळाची असते. संगम अर्बन मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटीने केवळ एका वर्षात चांगली उभारी घेतली आहे. भविष्यातसुद्धा ग्राहकांचे हित व बँकेची प्रगती याचा संगम साधावा असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी केले.

संगम अर्बन मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटीचा प्रथम वर्धापनदिन व अर्धापूर येथील



शाखेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर, स्थायी समितीचे माजी सभापती किशोर स्वामी, भाजपाचे प्रदेश प्रतिनिधी धर्मराज देशमुख, नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष प्रतिनिधी *(पान दोनवर)*

### प्रजापिता ब्रह्माकुमारीच्या दादी रतनमोहिनी यांचे निधन

**नवी दिल्ली, दि. ९ :** आध्यात्मिक जगातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व आणि प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विद्यापीठाच्या मुख्य प्रशासक



राजयोगिनी डॉ. दादी रतनमोहिनी (वय १०१) यांचे आज निधन झाले. दोन दिवसांपूर्वी आजारी पडल्यामुळे त्यांना अहमदाबादमधील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज पहाटे १:२० वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचे अंत्यसंस्कार शांतीवनमध्ये करण्यात आले. दादी रतनमोहिनी यांनी १०० वर्षे आध्यात्मिक जीवन पूर्ण करून एक नवीन टप्पा गाठला. अवघ्या १३ व्या वर्षी त्यांनी आपले जीवन दैवी सेवेसाठी समर्पित केले होते. गेल्या २५ मार्च रोजी त्यांचा १०१ वा *(पान दोनवर)*

# रेकॉर्डवरील १३ सराईत गुन्हेगार स्थानबद्ध तरीही दहशतीचे प्रकार सुरूच

### गुन्हेगारांच्या आकाचे काय? : नांदेडकर सुजाण नागरिकांचा सवाल

**नांदेड, दि. ९ :** शहरासह जिल्ह्यात चालणारी गुन्हेगारी आकाच्या आदेशानेच सुरु असते हे वास्तव आहे. यासाठी रेकॉर्डवरील १३ सराईत गुन्हेगाराना कारागृहामध्ये 'स्थानबध्द' करण्यात आले असले तरी त्यांच्या आकांचे काय असा प्रश्न सामान्य नागरिकांतून उपस्थित करण्यात येत आहे.

जिल्ह्यात गुन्हेगारीत वाढ झाली आहे. नशेच्या आहारी गेलेले अनेक तरुण गुन्हेगारीच्या चक्रात अडकले आहेत. यांना त्यांच्या आकांचे प्रोत्साहन तसेच संरक्षणाचे इफेक्ट दिसून येत आहेत. पोलिसांनी नुकतेच घातक शस्त्र ताब्यात बाळगणे, कट रचुन खून करुन पुरावा नष्ट करणे, खुनाचा प्रयत्न, अपहरण, दुखापत करुन खंडणी वसूल करणे, घरात घुसून मारहाण, सार्वजनिक ठिकाणी अश्लिल शिवीगाळ, घातक हत्यारानिशी जबरी चोरी, अपहरण करुन ठार मारण्याची धमकी देणे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे दखलपात्र गुन्हे दाखल असलेल्या दिलीपसिंघ हरीसिंघ पवार याच्यासह १३ सराईत गुन्हेगाराना कारागृहामध्ये स्थानबध्द केले आहे. अशा बातम्यांतून पोलीस प्रशासन स्वतः ची पाठ थोपटून घेत असले तरी गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवणे अशक्य आहे. समाजविघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रचलित कायद्यान्वये करण्यात आलेल्या प्रतिबंधक कारवाया अपुऱ्या व कुचकामी ठरत असून पुन्हा गुन्हेगारी वाढू नये यासाठी केवळ गुन्हेगारांना कारागृहात स्थानबद्ध करण्या पेक्षा या गुन्हेगारांना प्रोत्साहन तसेच त्यांचे संरक्षण करणाऱ्या आकांना धडा शिकवणे पोलीस प्रशासनांकडून अपेक्षित आहे. अन्यथा आकांना स्वरंक्षण आणखी गुन्हेगारांवर कारवाईने गुन्ह्याची मालिका थांबणार नाही. पोलीस प्रशासनाला अशा आकांची शोध मोहीम राबवून त्यांना जेरबंद केल्यास निश्चित जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित तसेच कायद्याचा आदर करणारे शांतताप्रिय नागरिकांना त्रास देणारे उपद्रवी गुन्हेगारांवर जरब निर्माण होईल असे नांदेडकरांचे म्हणणे आहे.

### उन्हाचा चटका वाढल्याने शेती कामावर परिणाम

# जिल्ह्याचा पारा @ ४१

**नांदेड, दि. ९ :** एप्रिल महिना सुरु होताच कमाल तापमानाचा पारा ४१.५ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २३.८ अंश सेल्सिअसवर पोहोचल्यामुळे उन्हाच्या झळा चांगल्याच जाणवत आहेत. यामुळे शेतीकामावर परिणाम होत असल्याने मजूर सकाळी सात ते दुपारी एकपर्यंतच काम करीत आहेत.

जिल्ह्यात दरवर्षी उन्हाळा अधिक कडक असतो. यंदाही तो अधिक कडक जाणवेल असे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. जिल्ह्यात मार्चमध्ये कमाल तापमान ३८ अंश सेल्सिअसपर्यंत गेले होते. एप्रिल सुरू होताच यात भर पडून सध्या ४१.८ अंश सेल्सिअसवर पोहोचले आहे. किमान तापमानही २३.८ अंश सेल्सिअस नोंदले गेले तर हवेतील आर्द्रतेचे प्रमाण ४८ टक्के आहे. त्यामुळे सध्या उन्हाची तीव्रता जाणवत आहे. उन्हाळ्याचे आणखी दोन महिने शिल्लक असल्याने मे महिन्यात तापमान यापेक्षा अधिक वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. वाढत्या तापमानाचा परिणाम शेतीकामावर दिसून येत आहे. सध्या अनेक शेतकरी हळदीची काढणी करून त्यावर प्रक्रिया करण्याच्या कामात आहेत. उन्हापासून बचाव होण्यासाठी बागायती पिके, भाजीपाला, फळपिकांच्या कामासाठी *(पान दोनवर)*

# बिदर-नांदेड रेल्वे मार्गासाठी कर्नाटकच्या मंजुरीची प्रतीक्षा

### २,३५४ कोटींचा खर्च अपेक्षित : ५० टक्के खर्चाला महाराष्ट्राची सहमती

**नवी दिल्ली, दि. ९ :** बिदर आणि नांदेडला जोडणारा प्रस्तावित १५५ किमीचा रेल्वेमार्ग कर्नाटक आणि महाराष्ट्रासोबतच्या खर्चाच्या वाटणीच्या व्यवस्थेवर अवलंबून आहे. जमिनीच्या किमतींसह प्रकल्पाच्या ५० टक्के खर्च महाराष्ट्राने उचलण्यास सहमती दर्शवली आहे. परंतु, कर्नाटक सरकारची संमती अद्याप प्रलंबित आहे, अशी माहिती रेल्वे मंत्रालयाने नुकतीच संसदेत दिली आहे.

बिदर आणि नांदेड दरम्यानच्या १५५ किमीच्या नवीन मार्गाचे सर्वेक्षण आधीच झाले आहे आणि सविस्तर प्रकल्प अहवालात (डीपीआर) २,३५४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. तथापि, मार्गावरील वाहतूक अंदाज कमी असल्याने, केंद्राने महाराष्ट्र आणि कर्नाटकला त्यांच्या राज्यातील बांधकामाचा अर्धा खर्च वाटून घेण्यास सांगितले आहे. बिदर हे परळी वैजनाथ आणि परभणीमार्गे नांदेडशी आधीच जोडलेले आहे. बिदर आणि नांदेड दरम्यान थेट जोडणीसाठी, बिदर-नांदेड (१५५ किमी) दरम्यान नवीन मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे आणि त्याची किंमत २३५४ कोटी रुपये निश्चित करण्यात *(पान दोनवर)*

### उन्हाळी हंगामात पाणी मिळल्याने शेतकऱ्यांत समाधान

# जिल्ह्यात २६,५५६ हेक्टरवर उन्हाळी पिके

**नांदेड, दि. ९ :** अपेक्षित पाणीसाठा असल्याने उन्हाळी पिकांना पाणी पाळ्या सोडण्यात येणार असल्याने अनेकांनी उन्हाळी पिके घेतली आहेत. नांदेड जिल्ह्यात २६ हजार ५५६ हेक्टरवर उन्हाळी पिके घेण्यात आली आहेत. तर मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत सर्वसाधारण एक लाख चार हजार ३८५ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत एक लाख २८० हेक्टरवर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे.

यंदाच्या उन्हाळी हंगामासाठी छत्रपती संभाजीनगर कृषी विभागातील तीन जिल्ह्यांत सर्वसाधारण क्षेत्र *(पान दोनवर)*



| जिल्हानिहाय प्रत्यक्ष पेरणी क्षेत्र (हेक्टरमध्ये) | |
|---|---|
| नांदेड | २२४४१ |
| लातूर | २३९६ |
| धाराशिव | ९५५५ |
| परभणी | १०९५९ |
| हिंगोली | २६३४९ |
| छ.संभाजीनगर | १४९०३ |
| जालना | १०२९८ |
| बीड | ७४५६ |

| जिल्हानिहाय सर्वसाधारण क्षेत्र (हेक्टरमध्ये) | |
|---|---|
| नांदेड | २६५५६ |
| लातूर | ३८८५ |
| धाराशिव | ६२८९ |
| परभणी | ७६६९ |
| हिंगोली | १३९८० |
| छ.संभाजीनगर | २०६२६.९० |
| जालना | ११९००.९० |
| बीड | १०१७४ |



## सं । क्षि । प्त

### नाईट क्लबचे छत कोसळून ७९ जणांचा मृत्यू

**सँटो डोमिंगो :** डोमिनिकन रिपब्लिकची राजधानी असलेल्या सँटो डोमिंगो येथे मंगळवारी (दि.८) रात्री एका नाईट क्लबचे छत कोसळून ७९ लोकांचा मृत्यू झाला. याशिवाय १६० लोक या घटनेत गंभीर जखमी झाले आहेत. छत कोसळले तेव्हा ५०० ते १००० लोक उपस्थित होते. मोंटेक्रिस्टीचे गव्हर्नर नेल्सी क्रूझ, माजी मेजर लीग बेसबॉल खेळाडू ऑक्टाव्हियो डोटेलचाही यामध्ये मृत्यू झाला. प्रसिद्ध मेरेंग्यू गायिका रुबी पेरेझ नाईट क्लबमध्ये परफॉर्म करत असताना ही घटना घडली. त्यांचे व्यवस्थापक एनरिक पॉलिनो यांनी सांगितले की, रात्री १२ च्या सुमारास हा कार्यक्रम सुरू झाला आणि सुमारे एक तासानंतर नाईट क्लबचे छत कोसळले. या अपघातात गायिका रुबी पेरेझचाही मृत्यू झाला.

### पिंपरी-चिंचवड मनपाच्या ६५० रुग्णालयांना नोटीसा

**पुणे :** दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील तनिषा भिसे यांच्या मृत्यूनंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने ६५० रुग्णालयांना नोटीस पाठवून रुग्णांकडून अनामत रक्कम घेऊ नये, असे बजावले आहे. कोणत्याच रुग्णांकडून अनामत रक्कम घेऊ नका, असे घडल्यास रुग्णालयाची नोंदणी रद्द करण्यात येईल, असा इशारा पालिकेने नोटीसीद्वारे रुग्णालयांना दिला आहे.

### पुण्यात परदेशी तरुणीवर अत्याचार, सात जणांना अटक

**पुणे :** पुण्यात २७ वर्षीय परदेशी महिलेवर सात जणांनी सामूहिक बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पीडित तरुणीने समर्थ पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार पोलिसांनी सात जणांना अटक केली आहे. २०२० पासून पुण्यात वास्तव्यास असलेल्या भूतानच्या महिलेवर सात जणांनी लैंगिक अत्याचार केला. राष्ट्रवादीचा माजी पदाधिकारी शंतनू कुकडे याच्यासह त्याच्या मित्रांना पोलिसांनी अटक केली आहे. कुकडे याच्यावर काही दिवसांपूर्वी दोन तरुणींचा लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. शंतनू कुकडे, ऋषिकेश नवले, जालिंदर बडदे, उमेश शहाणे, प्रतीक शिंदे, ॲड. विपीन बिडकर, सागर रासगे, अविनाश सूर्यवंशी आणि मुद्दासीन मेनन यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी सात जणांना अटक केली आहे.

### पिनारायी विजयन यांच्या कन्येची ईडीकडून चौकशी ?

**थिरुवअनंतपूरम :** केरळचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांची कन्या टी. वीणा यांच्याविरुद्ध मनी लाँड्रिंगचा खटला दाखल करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कोट्टायम जिल्हा परिषदेचे सदस्य आणि नुकतेच भाजपामध्ये सहभागी झालेले झालेले ज्येष्ठ नेते पी. सी. जॉर्ज यांचे पूत्र शोन जॉर्ज यांच्या तक्रारीवरून ईडीने मार्च २०२४ मध्ये वीणा यांच्याशी संबंधित कथित बेकायदेशीर पेमेंट घोटाळ्याची चौकशी सुरू केली होती. २०२३ पासून वीणा या केंद्रीय संस्थांच्या रडारवर आहेत. वीणा अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत होत्या, तेव्हापासूनच त्या वादाच्या भोवऱ्यात आहेत.

### लैंगिक शोषणप्रकरणी शिक्षकाला १८७ वर्षांची शिक्षा

**थिरुवअनंतपूरम :** केरळमधील कन्नूर जिल्ह्यातील मदरशामधील शिक्षकाला १८७ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. कोरोनाच्या काळात एका अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. कन्नूर जिल्ह्यातील तालिपरंबा सत्र न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली. आरोपी मुहम्मद रफी हा अलकोडे येथील रहिवासी असून त्याला नऊ लाखांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. २०२० ते २०२१ या काळात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाले. आरोपी हा अट्टल गुन्हेगार आहे. याआधीही त्याने अशाच प्रकारचा गुन्हा केला होता. वलापट्टणम पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात पूर्वी पोक्सोचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात जामीन मिळाला असताना त्याने कन्नूर जिल्ह्यात दुसरा गुन्हा केला.

### आई-मुलासह तिघांचा नदीत बुडून मृत्यू

**ठाणे :** शहापूरजवळ भातसा नदीत बुडून मुलगा आणि आईसह तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शहापूरातील वाफे हद्दीतील भातसा नदीत ही घटना घडली. दोन महिलासह एक मुलगा नदीवर कपडे धुण्यासाठी गेले होते. तोल गेल्याने पाण्यात बुडून तिघांचा मृत्यू झाला आहे. तिघेही शहापूर जवळील राहणारे असल्यामुळे घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती. वनिता सुदर्शन शेळके (वय ३३), लक्ष्मी दत्तात्रय पाटील (वय ५०) आणि धीरज दत्तात्रय पाटील (वय १७) अशी मृतांची नावे आहेत.

### गुरुमीत राम रहीमला २१ दिवसांची फर्लो रजा


**चंदीगड :** वादग्रस्त आध्यात्मित बाबा गुरमित राम रहीम सिंहला २१ दिवसांची फर्लो रजा मंजूर करण्यात आली आहे. बलात्काराच्या आरोपाखाली दोषी ठरल्याने गुरुमित राम रहीमला २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा मिळालेली आहे. हरियाणातील रोहतकमधील सुनारिया जेलमध्ये तो सध्या सजा भोगत आहे. बुधवारी त्याला जेलमधून सोडण्यात आले. यावर्षी बाबाला दुसऱ्यांदा जेलच्या बाहेर राहण्याची मुभा मिळाली आहे.

## हॉलिवूड चित्रपटांना चीनमध्ये बंदी : अमेरिकेकडून १०४ टक्के कर लादताच जिनपिंग भडकले

# चीन आवळणार अमेरिकेच्या आर्थिक नाड्या !

**बीजिंग, दि. ९ :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या १०४ टक्के शुल्काला प्रत्युत्तर म्हणून चीनने अमेरिकेची आर्थिक नाडी आवळण्यास सुरुवात केली आहे. नऊ एप्रिलपासून हे १०४ टक्के अतिरिक्त शुल्क लागू झाले आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून चीनने हॉलिवूड चित्रपटांना आपल्या देशांत प्रदर्शित करण्याची बंदी आणल्याची माहिती समोर आली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनने आपला ३४ टक्क्यांचा प्रत्युत्तरात्मक कर मागे घेतला नाही, तर ते चिनी आयातीवर अतिरिक्त ५० टक्के कर लादतील. अशा परिस्थितीत चीन आता हॉलिवूड चित्रपटांवर बंदी घालण्याचा विचार करत आहे.

आंतरराष्ट्रीय माध्यमांमधील वृत्तांनुसार, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कर लादण्याच्या प्रत्युत्तरात चीन आपल्या बाजारपेठेतून हॉलिवूड चित्रपटांवर बंधने घालू शकतो. डेली मेलच्या वृत्तानुसार, अमेरिकेकडून वाढत्या शुल्काच्या धमक्या चीन कधीही स्वीकारणार नाही. कम्युनिस्ट पक्षाशी संबंधित एका चिनी पत्रकाराने बीबीसीच्या रेडिओ ४ कार्यक्रमात सांगितले, की चीन आता सोयाबीनसारख्या अमेरिकन कृषी निर्यातीवर जास्त शुल्क




लादेल, सर्व अमेरिकन पोल्ट्रींना चीनमध्ये प्रवेश करण्यास बंदी घालेल आणि अमेरिकन चित्रपटांना देशात प्रवेश करण्यास बंदी घालेल. डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या धमकीला चीनने चुकांवर चुका म्हटले असून त्या थांबवण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे म्हटले आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, २०२४ मध्ये अमेरिकन चित्रपटांनी चीनमध्ये ५८५ दशलक्ष डॉलर्सची कमाई केली, जी चीनच्या १७.७१ अब्ज डॉलर्सच्या बॉक्स ऑफिसच्या सुमारे ३.५ टक्के होती. वॉर्नर ब्रदर्स आणि लेजेंडरी यांचा अलिकडेच प्रदर्शित झालेला अ माइनक्राफ्ट चित्रपट अमेरिकन चित्रपटांवर बंदी घातल्याने जुरासिक वर्ल्ड : रिबर्थ, द अकाउंटंट २ आणि मिशन इम्पॉसिबल या सिक्वेलसारख्या आगामी चित्रपटांना चिनी बाजारपेठेत अब्जावधी डॉलर्सचे नुकसान होईल. यामुळे हॉलिवडूचेही मोठे नुकसान होणार आहे.

### कच्च्या तेलाच्या किमतींत घसरण

अमेरिकेने केलेल्या टॅरिफमधील वाढनंतर कच्च्या तेलाच्या किमतींत मोठी घसरण झाली आहे. तेलाच्या किमती २०२१ नंतरच्या सर्वात कमी पातळीवर पोहोचल्या. कच्च्या तेलाच्या किंमती सलग पाचव्या दिवशी घसरल्या आहेत. २०२१ नंतरच्या सर्वात कमी पातळीवर पोहोचल्या आहेत. ब्रेंट क्रूडची किंमत प्रति बॅरल ६०.२२ डॉलर आहे आणि अमेरिकन तेलाची किंमत प्रति बॅरल ५७.०४ डॉरलवर आली आहे.

### चीनकडून अमेरिकेवर ८४ टक्के शुल्क

अमेरिकेने नऊ एप्रिलपासून चीनवरील आयात शुल्क १०४ टक्के वाढवल्यानंतर, चीनने १० एप्रिलपासून अमेरिकेतून येणाऱ्या सर्व वस्तूंवर ३४ टक्क्यांऐवजी ८४ टक्के आयात शुल्क लावण्याची घोषणा केल्याने व्यापार युद्ध भडकले आहे. चीनने १२ अमेरिकन संस्थांना निर्यात नियंत्रण यादीत समाविष्ट केले आहे. तसेच, ६ कंपन्यांना त्यांच्या अविश्वासू यादीत टाकले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर १०४ टक्के जास्त कर (टॅरिफ) लादला आहे. प्रत्युत्तरादाखल, अमेरिकेतून येणाऱ्या सर्व वस्तूंवर ३४ टक्क्यांऐवजी ८४ टक्के आयात शुल्क लावण्याची घोषणा चीनने केली आहे. या संघर्षामुळे जगात मंदीची भीती वाढली आहे. दरम्यान, युरोपियन युनियन आणि कॅनडा देखील ट्रम्प यांच्या टॅरिफला प्रत्युत्तर देण्याची तयारी करत आहेत.

## अमेरिका-चीनदरम्यान व्यापारयुद्ध तीव्र

आयात शुल्कानंतर अमेरिका आणि चीन यांच्यात व्यापारयुद्ध आणखी तीव्र झाले आहे. यातच काही चिनी निर्यातदारांनी अमेरिकेने लादलेल्या तगड्या टॅरिफपासून वाचण्यासाठी समुद्र प्रवासादरम्यानच आपला माल अर्ध्यावर सोडून कंटेनर शिपिंग कंपन्यांना सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. उद्योग जगतात याला लाँग मार्चची तयारी म्हटले जाते. म्हणजेच एक दीर्घ आणि खडतर आर्थिक मंदीचा सामना. साऊथ चायना पोस्टने दिलेल्या वृत्तानुसार, चीनमधील एका लिस्टेड कंपनीने ट्रम्प सरकाने लादलेल्या नव्या टॅरिफनंतर त्यांची अमेरिकेतील दैनंदिन शिपमेंट ४०-५० कंटेनरवरून केवळ ३-६ कंटेनरवर आली आहे. यामुळे व्यापार युद्ध भडकण्याची शकता निर्माण झाली आहे. कंपनीच्या कर्मचाऱ्याने म्हटले आहे, की आम्ही फिलीपिन्स, व्हिएतनाम, इंडोनेशिया आणि मलेशियातून येणारे सर्व शिपिंग रोखले आहे. कारखान्यांची ऑर्डर रद्द करण्यात आले आहेत. अद्याप लोड न झालेल्या वस्तू स्क्रॅप केल्या जात आहेत आणि समुद्रात असलेल्या वस्तूंची किंमत पुन्हा निश्चित केली जात आहे. महत्वाचे म्हणजे, व्यापार युद्धापासून वाचण्यासाठी, चिनी निर्यातदारांनी आता अमेरिकेऐवजी युरोप आणि जपानकडे आपला मोर्चा वळवला आहे.

## मुंबई, चेन्नई, हैदराबादचा प्लेऑफचा मार्ग खडतर

### आयपीएलची लढाई रोमांचक स्थितीत



**मुंबई, दि. ९ :** आयपीएलमध्ये मंगळवारी रात्रीपर्यंत २२ सामने झाले आहेत. आता प्रत्येक सामन्यासोबत प्लेऑफमध्ये पोहोचण्याची लढाई अधिक रोमांचक होत आहे. पाच वेळच्या विजेत्या मुंबई आणि सीएसके या दोन संघांना यावेळी प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे.

अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील दिल्लीने अद्याप एकही सामना गमावला नाही. तीनपैकी तीन सामने जिंकून सहा गुण आणि +१.२५७ नेट रनरेटसह दिल्ली आघाडीवर आहे. प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी, त्यांना ११ पैकी किमान ५ सामने जिंकावे लागतील. गुजरातने चारपैकी तीन सामने जिंकले आहेत. त्यांना १० पैकी किमान ५ सामने जिंकावे लागतील. आरसीबीने चारपैकी तीन सामने जिंकले असून पुढील १० पैकी किमान पाच सामने जिंकावे लागतील. पंजाबने चारपैकी ३ सामने जिंकले आहेत. तर १० सामन्यांमध्ये किमान पाच सामने जिंकावे लागतील. लखनऊने पाचपैकी ३ सामने जिंकले आहेत. आता नऊपैकी किमान ५ सामने जिंकावे लागतील. केकेआरने पाचपैकी फक्त २ सामने जिंकले आहेत. पुढील नऊपैकी किमान ६ सामने जिंकावे लागतील. राजस्थानला पुढील १० सामन्यांपैकी किमान ६ सामने जिंकावे लागतील. मुंबईने पाचपैकी फक्त एक सामना जिंकला आहे. मुंबईला अजून नऊ सामने खेळायचे आहेत. प्लेऑफच्या शर्यतीत स्थान मजबूत करण्यासाठी त्यांना किमान सात सामने जिंकावे लागतील. सीएसकेने पाचपैकी फक्त एक सामना जिंकला आहे. त्यांनाही आणखी नऊ सामने खेळायचे आहेत. प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी त्यांना किमान ७ सामने जिंकावे लागतील. हैदराबादने पाचपैकी चार सामने गमावले आहेत. आता उरलेल्य हैदराबादला पुढील नऊपैकी सात सामने जिंकावे लागतील, अन्यथा संघाची प्लेऑफमध्ये पोहोचण्याची शक्यता जवळजवळ संपुष्टात येईल.

## पक्षाला वेळ द्या, नाही तर निवृत्ती घ्या !

### मल्लिकार्जुन खर्गेंनी सभेत काँग्रेस नेत्यांना खडसावले

**अहमदाबाद, दि. ९ :** पक्षाने दिलेली जबाबदारी पार पाडायची नसेल, पक्षाने सांगितलेली कामे करायची नसतील तर निवृत्ती घ्या, अशा शब्दांत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचे कान टोचले.

गुजरातमध्ये काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भाषणे झाली. खर्गे यांनी पक्षाच्या सर्व नेत्यांना कडक संदेश दिला. खर्गे म्हणाले, की संघटनेच्या जडणघडणीत जिल्हाध्यक्षांची भूमिका महत्त्वाची असणार आहे. म्हणूनच त्यांची नियुक्ती एआयसीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार काटेकोरपणे आणि निष्पक्षपणे केली पाहिजे. जिल्हाध्यक्षांनी नियुक्ती झाल्यापासून एका वर्षाच्या आत सर्वोत्तम लोकांचा समावेश करुन बूथ कमिटी, मंडल कमिटी, ब्लॉक कमिटी आणि जिल्हा कमिटी तयार करावी.

यामध्ये कोणताही पक्षपात नसावा. आम्ही देशभरातील जिल्हाध्यक्षांच्या तीन बैठकाही बोलावल्या. मी आणि राहुल गांधी यांनी त्यांच्याशी बोललो आणि त्यांचे मत जाणून घेतले. भविष्यात आम्ही निवडणुकीसाठी उमेदवार निवड प्रक्रियेत जिल्हाध्यक्षांना सहभागी करून घेणार आहोत. तरीही जे पक्षाच्या कामात मदत करत नाहीत, दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडत नाहीत, त्यांनी निवृत्त व्हावे. आपण पुन्हा एकदा भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहोत.

स्वातंत्र्याच्या या दुसऱ्या लढाईत पुन्हा शत्रू अन्याय, असमानता, भेदभाव, गरिबी आणि सांप्रदायिकता आहेत. फरक एवढाच आहे, की पूर्वी परदेशी लोक अन्याय, गरिबी आणि असमानतेला प्रोत्साहन देत होते, आता आपले स्वतःचे सरकार ते करत आहे. पूर्वी परदेशी लोक जातीयवादाचा फायदा घेत असत, आज आपलेच सरकार त्याचा फायदा घेत आहे. पण, आपण ही लढाई देखील जिंकू, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

# सर्वांना न्यायासाठी देशाचा एक्स-रे व्हावा

### जातनिहाय जनगणनेचा राहुल गांधींकडून पुनरुच्चार

**अहमदाबाद, दि. ९ :** आपण देशाचा एक्स-रे करुन पाहिला पाहिजे, जेणेकरुन देश खरोखरच दलित, गरीब, मागासलेल्यांचा आदर करतो का, हे समजेल. तेलंगणामध्ये आम्ही जात जनगणनेचे क्रांतिकारी पाऊल उचलले. आम्ही संसदेत जातीय जनगणनेची मागणी केली होती. पण, सरकारने स्पष्टपणे नकार दिला. मी फक्त जातीय जनगणनेची मागणी केली, ज्याद्वारे मला जाणून घ्यायचे होते की, या देशात देशात कोणाचा सहभाग किती आहे, असे म्हणत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज पुन्हा जातनिहाय जनगणनेच्या मागणीचा पुनरुच्चार केला.

अहमदाबाद येथे सुरु असलेल्या काँग्रेस अधिवेशनात राहुल गांधी यांनी दलित, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक, आरक्षण, आरएसएस, अदानी-अंबानी, बांगालादेश आणि ट्रम्प टॅरिफ मुद्द्यावर भाष्य केले. तसेच जातीय जनगणनेच्या मागणीचा पुनरुच्चार केला. तेलंगणातील ९० टक्के लोकसंख्या ओबीसी, अत्यंत मागासवर्गीय, दलित, अत्यंत दुर्लक्षित दलित, अल्पसंख्याक आणि आदिवासींची आहे. तुम्ही तेलंगणातील कॉर्पोरेट क्षेत्राकडे पाहिले, मालक, सीईओ आणि वरिष्ठ व्यवस्थापनाची यादी पाहिली, या ९० टक्के लोकसंख्येपैकी एकही व्यक्ती सापडणार नाही. जातनिहाय जनगणनेनंतर तेलंगणातील आमच्या मुख्यमंत्र्यांनी ओबीसी आरक्षण ४२ टक्क्यांपर्यंत वाढवले, असेही राहुल गांधी म्हणाले. पंतप्रधान २४ तास मागासवर्गीयांबद्दल बोलतात. पण, जेव्हा सहभागाचा प्रश्न येतो, तेव्हा भाजपाचे लोक गप्प बसतात. आम्ही पुन्हा सत्तेत आल्यावर ५० टक्के आरक्षणाची भिंत तोडू, जात जनगणना करू, असे सांगून राहुल गांधी यांनी अमेरिकन टॅरिफबाबतही भाष्य केले. ट्रम्प यांनी नवीन शुल्क लादणार असल्याचे सांगितले होते. मोदी सरकारने यावर काहीही केले नाहीत. देशावर गंभीर आर्थिक संकटे येणार आहेत. पण, नरेंद्र मोदी गप्प आहेत, अशी टीकाही त्यांनी केली. मी एससी/एसटी उपयोजनेचा मुद्दा उपस्थित केला होता.

आम्ही एक क्रांतिकारी कायदा आणला होता. पण, भाजपाने हा कायदा रद्द केला. भाजपा देशातील सर्व संस्थांवर एक-एक करून हल्ला करत आहे. जिथे दलित, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक आणि गरीब सामान्य वर्गातील लोकांना स्थान मिळत होते, तिथे भाजपाने सर्व ठिकाणांचे दरवाजे बंद केले आहेत, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.

## पान एकवरून

**तहव्वूर राणाचे प्रत्यार्पण...**

न्यायालयात केलेला अर्ज नुकताच फेटाळण्यात आला. त्यानंतर राणाच्या प्रत्यार्पणासाठी भारतातील अनेक तपास यंत्रणाची पथके अमेरिकेत दाखल झाली. त्यानुसार त्याला घेऊन एक विशेष विमान आज सायंकाळी अमेरिकेतून निघाले आहे. दुसरीकडे या सर्व पार्श्वभूमीवर भारतातील हालचालींना वेग आला आहे. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची आज भेट घेतल्याची माहिती मिळाली आहे. तहव्वूर राणाच्या भारतातील प्रत्यार्पणाबाबत गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडे अमेरिकेच्या दौऱ्यात डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली होती. त्यावेळी बैठकीत अमेरिकेने राणाच्या प्रत्यार्पणाची मागणी मान्य केली. परंतु, राणाने प्रत्यार्पणाविरोधात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत याला स्थगिती देण्याची मागणी केली होती. ही याचिका फेटाळली. तहव्वूर राणा सध्या लॉस एंजेलिसच्या तुरुंगात बंद होता. त्याला भारतात आणण्याच्या पार्श्वभूमीवर दिल्ली आणि मुंबईतील सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

दरम्यान, तहव्वूर राणा आयएसआय आणि लष्कर ए तोयबाचा सदस्य आहे. तो डेविड हेडलीचा खास मानला जात होता. हल्ल्याअगोदर तहव्वूर आणि हेडली यांची अनेकदा बैठक झाली. डेविड हेडलीने अमेरिकन तपास यंत्रणेसमोर तहव्वूरचे नाव घेतले होते. हेडली मुंबई हल्ल्याआधीच भारतात आला होता. त्याने मुंबईतील ताज हॉटेल, लियोपोल्ड कॅफेसह अन्य प्रमुख जागांची रेकी केली होती. त्यानंतर आयएसआय आणि पाकिस्तानी सैन्याद्वारे प्रशिक्षण दिलेले लष्कर ए तोयबाचे दहशतवादी मुंबईत शिरले आणि त्यांनी ताज हॉटेलसह इतर ठिकाणांवर हल्ले केले.

**गृहसह इतर कर्ज स्वस्त...**

यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मॉनिटरी पॉलिसी कमिटीच्या बैठकीत एकमताने दर कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. सात ते आठ फेब्रुवारी दरम्यान ही बैठक पार पडली. रिझर्व्ह बँकेने नवीन आर्थिक वर्षात पहिल्याच महिन्यात ही कपात केली आहे. याआधी आरबीआयने फेब्रुवारीमध्ये रेपोदरात ०.२५ टक्के कपात केली होती. ही कपात पाच वर्षांनी करण्यात आली होती. त्यानंतर आज पुन्हा कपात करण्यात आली. आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत अमेरिकेने नव्याने मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लागू केल्याचा परिणाम हा महागाईपेक्षा देशाच्या आर्थिक विकास दरावर परिणाम होण्याची चिंता अधिक आहे, अशी भीती व्यक्त केली. महागाई कमी होत असताना वाढलले आयात शुल्क आणि मंदावलेला जागतिक व्यापार यासारख्या बाह्य जोखमी भारताच्या निर्यातीवर आणि एकूण आर्थिक घडामोडींवर परिणाम करू शकतात. येत्या काही महिन्यांत विकास दरवाढ आणि चलनवाढ दोन्ही व्यवस्थापित करण्यासाठी आरबीआय आणि सरकार एकत्र काम करतील. चलनवाढीचा दर कमी झाला आहे. तो लक्ष्य मर्यादितच राहील, परंतु जागतिक व्यापारात अधिक अडथळे आल्यास विकासावर परिणाम होऊ शकतो, असेही मल्होत्रा यांनी स्पष्ट केले. इतर देशांपेक्षा लादलेल्या आयात शुल्कापेक्षा भारतावर परिणाम खूपच कमी आहे. तरीही भारताला अजूनही सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता आहे. कारण जगभरातील व्यापक व्यापार निर्बंध भारतीय वस्तू आणि सेवांची मागणी कमी करू शकतात, असेही मल्होत्रा म्हणाले.

**ग्राहकांचे हित व बँकेची...**

प्रविण देशमुख, माजी सभापती श्यामराव पाटील टेकाळे, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, नगरसेवक बाबुराव लंगडे, विशाल लंगडे, प्रल्हाद माटे, बँकेचे अध्यक्ष गजानन वडजे, उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील चाडोंळकर, भाजपा प्रवक्ते तथा ज्येष्ठ संचालक संतोष पांडागळे, गुरुराज पाटील चांडोळकर, बालाजीराव कल्याणकर, डॉ. कैलास भाडेकर, बालाजी जाधव, प्रियांका वडजे, ज्योती डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. खा.अशोकराव चव्हाण म्हणाले, की अर्धापूर येथे शेतकरी व व्यापाऱ्यांना उत्पन्नाचे स्त्रोत चांगले आहेत. त्यामुळे एकाच परिसरात चार मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटीच्या शाखा चालतात. भविष्यातसुद्धा संगम अर्बनने आपला व्यवहार चोख सांभाळत जिल्हाभर शाखांचा विस्तार केला पाहिजे. अर्धापूर येथील त्यांची ही दुसरी शाखा असून या शाखेच्या माध्यमातून ग्राहकांचे हित जोपासतानाच संस्थेच्या प्रगतीकडे संचालकांनी लक्ष देण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व श्री प्रभू रामचंद्र यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. खा.अशोकराव चव्हाण यांचे स्वागत व्यंकटराव पाटील चांडोळकर व संतोष पांडागळे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष गजानन वडजे यांनी केले. आभार संतोष पांडागळे यांनी मानले. वर्धापनदिन व शाखा उद्घाटन सोहळ्यास अर्धापूर शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रजापिता ब्रह्माकुमारीच्या...**

वाढदिवस साजरा करण्यात आला. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विद्यापीठाच्या संस्थापक सदस्यांपैकी त्या एक होत्या. दरम्यान, त्यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, गृहमंत्री अमित शहा, सरसंघचालक प्रमुख मोहन भागवत, यांच्यासह अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

**जिल्ह्याचा पारा...**


लागणारे मजूर सकाळी सात ते दुपारी एक या वेळेत काम करण्याला प्राधान्य देत आहेत. मागील आठवड्यात जिल्ह्यात हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिला होता. या काळात जिल्ह्यात दोन-तीन दिवस ढगाळ वातावरण होते. त्यामुळे कमाल तापमान ३५ अंशांपर्यंत खाली घसरले होते. यावेळी जिल्ह्यातील सर्व तालुक्यात पावसाने हजेरी लावली होती. परंतु, हे अवकाळीचे ढग गेल्यावर तापमानाने आपली गती पुन्हा पकडली आहे. ४० अंशांच्या पुढे गेलेल्या तापमानाचा फटका सध्या अनेकांना बसत आहे.

**बिदर-नांदेड रेल्वे मार्गासाठी...**

आली आहे. या प्रकल्पात कमी वाहतूक अंदाज असल्याने महाराष्ट्र आणि कर्नाटक सरकारला संबंधित राज्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या बांधकाम खर्चाचा ५० टक्के वाटा देण्याची विनंती करण्यात आली आहे, असे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. गेल्या आठवड्यात राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात महाराष्ट्र सरकारने जमिनीच्या किमतीसह ५० टक्के खर्च वाटप करण्यास सहमती दर्शविली आहे. तथापि, कर्नाटक सरकारची संमती अपेक्षित आहे, असे त्यांनी सांगितले. लातूर ते नांदेड (९१.३ किमी) आणि बिदर ते नांदेड (१५७ किमी) अशा दोन नवीन रेल्वेमार्गांना सरकारने मंजुरी दिली आहे का किंवा मंजुरी दिली आहे का, असे मंत्र्यांना विचारण्यात आले. नांदेड हे परळी वैजनाथ आणि परभणीमार्गे लातूरशी आधीच जोडलेले आहे. शिवाय थेट जोडणीसाठी, नांदेड आणि लातूर रोड दरम्यान नवीन रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण मंजूर करण्यात आले आहे आणि सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे, असे ते म्हणाले.

**जिल्ह्यात २६,५५६ हेक्टरवर...**

३२,६५८ हेक्टर होते. त्या तुलनेत प्रत्यक्षात ४१९०१ हेक्टरवर म्हणजे सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत १२८.३० टक्के क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे. दुसरीकडे लातूर कृषी विभागातील पाच जिल्ह्यांत सर्वसाधारण ७१ हजार ७०० हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत ५८,३७९ हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी पिकांची पेरणी झाली आहे. पेरणी झालेल्या एकूण क्षेत्रात उन्हाळी तिळांकडे जालना व बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा कल दिसतो. दोन्ही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी सर्वसाधारण क्षेत्राच्या पुढे जाऊन तिळाची पेरणी केली आहे. दुसरीकडे जालना जिल्ह्यात काही प्रमाणात उन्हाळी सोयाबीनचीही पेरणी झाल्याचे कृषी अहवालातून पुढे आले आहे. लातूर कृषी विभागातील पाच जिल्ह्यांत पेरणी झालेल्या उन्हाळी हंगामातील मका वाढीच्या अवस्थेत आहे. भुईमूग, इतर पिकही वाढ ते फुलोरा अवस्थेत आहेत. छत्रपती संभाजीनगर कृषी विभागातील मका पीक वाढ व कणसे लागण्याच्या अवस्थेत असून कणसे लागलेली उन्हाळी बाजरी दाणे पक्व होण्याचा अवस्थेत आहे. उन्हाळी भुईमूग फुलोरा ते आऱ्या सुटण्याच्या तर कुठे शेंगा लागण्याच्या अवस्थेत आहे. जालना व बीड जिल्ह्यांत उन्हाळी तीळ मूग व सूर्यफुलाची पेरणी करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यात उन्हाळी सोयाबीनचे सर्वसाधारण क्षेत्र ६९६ हेक्टर आहे. त्यातून एक ४७४ हेक्टरवर सोयाबीनची पेरणी झाली असून हे पीक फुले लागण्याच्या अवस्थेत आहे. जिल्ह्यात उन्हाळी सूर्यफुलाचे सर्वसाधारण क्षेत्र १३७ हेक्टर असून त्या तुलनेत ४४ हेक्टरवर सूर्यफुलाची पेरणी झाली आहे. याचे सर्वसाधारण क्षेत्र २१ हेक्टर असताना प्रत्यक्षात ३९ एप्रिल १७ तिळाची पेरणी झाली आहे. उन्हाळी मुगाची १३ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली असून पीक फुलोरा ते कळीशेंग लागण्याच्या अवस्थेत आहे. बीड जिल्ह्यात उन्हाळी तिळाचे सर्वसाधारण क्षेत्र ६५ हेक्टर असताना आतापर्यंत १७७ हेक्टरवर तिळाची पेरणी झाली आहे. भुईमुगाचे जिल्ह्यातील सर्वसाधारण क्षेत्र १३४ हेक्टर असताना प्रत्यक्षात ८० हेक्टरवर मुगाची पेरणी झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत पेरणीत वाढ नाही. भुईमूग व सूर्यफुलाचे क्षेत्र आहे तेवढेच आहे. उन्हाळी मका वाढलेला आहे.



## नायगाव पंचायत समितीचा अनागोंदी कारभार

# चौकशी करण्यासाठी गठीत केलेल्या समित्या कागदावरच

**नायगाव दि.९ (ता.प्र)–** तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामातील बोगसगिरी शोधण्यासाठी पंचायत समितीच्या स्तरावरून दि. २४ जानेवारी रोजी वेगवेगळ्या चार समित्या गठीत केल्या होत्या. या समितीवर जिल्हा परिषद गटनिहाय चौकशी करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. मात्र आजपर्यंत या समितीने एकही गावाला भेट दिली नाही. त्यामुळे भ्रष्टाचाराला या समितीचा पाठींबा असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

नायगाव तालुक्यात मनरेगाच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात आला आहे. या भ्रष्टाचारात पंचायत समितीचे अधिकारीही सहभागी असल्याने शेततळे, सिंचन विहीर, फुल शेती, गायगोठे मुख्यमंत्री पांदन रस्ता, शिव पांदन रस्ता व मातोश्री पांदन रस्ता, रोपवाटिका, सार्वजनिक वृक्ष लागवड अदि कामांचा अक्षरशः बोजवारा उडवण्यात आला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असताना गटविकास अधिकारी एल.आर. वाजे हे फक्त बघ्याची भुमिका घेत असल्याचा आरोप आहे.

नायगाव गटातील अधिकारी मनरेगाच्या कामात भ्रष्टाचार करणाऱ्यावर कुठलीच कारवाई करत नसल्याने रावसाहेब पवार व गणपत रेड्डी यांनी दि. १६ जानेवारी २०२५ रोजी एक निवेदन देवून मनरेगातील सर्व प्रकारच्या कामाची चौकशी करण्याची मागणी केली होती उपोषणाचाही इशारा दिला होता. त्यामुळे नायगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी वाजे यांनी दि. २४ जानेवारी रोजी जिल्हा परिषद गटनिहाय मनरेगाच्या कामाची चौकशी करण्यासाठी दोन विस्तार अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली वेगवेगळ्या चार समित्या गठीत केल्या. त्यात विस्तार अधिकारी एस.एम. निलमवार यांच्या अधिपत्याखाली दोन समित्या गठीत करण्यात आल्या त्यात कनिष्ठ अभियंता पि.एम.पाटील, गोणेवार, व्ही.बी.कदम, डि.एल. रानवळकर यांचा समावेश असून यांनी मांजरम व नरसी गटातील कामाची चौकशी करावी तर दुसरे विस्तार अधिकारी जि.आर. टोणगे यांच्या अधिपत्याखालीही दोन समित्या गठीत करण्यात आल्या असून या समितीने बरबडा व कुंटूर जिल्हा परिषद गटातील कामांची चौकशी करावी असे आदेश देण्यात आले. टोणगे यांच्या सोबत कनिष्ठ अभियंता जिरवणकर, बी.व्ही. कदम, पी.एम. सुर्यवंशी व पी.एम. पाटील यांना देण्यात आले.

सदरच्या समितीने मांजरम, नरसी, कुंटूर व.बरबडा जिल्हा परिषद गटातील मनरेगाच्या सर्व प्रकारच्या कामाची चौकशी करुन मुद्दतीत चौकशी अहवाल सादर करावा असे आदेश दिले होते. तब्बल तीन महिण्याचा कालावधी होत आला मात्र आजपर्यंत या समितीने एकाही कामाची चौकशी केली तर नाहीच पण कोणत्याही गावात फिरकले देखील नाहीत.

याबाबत विस्तार अधिकारी टोणगे यांना विचारणा केली असता अशी समिती गठीत केल्याचे लवकर आठवलेच नाही नंतर मात्र कामाच्या व्यस्ततेमुळे चौकशी करताच आली नसल्याची सारवासारव केली. एवढ्या चांगल्या योजनेत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी झाली पाहिजे याचे स्वारस्य ना गटविकास अधिकाऱ्यांचा आहे ना पंचायत समितीच्या विस्तार अधिकांना. त्यामुळे दोन महिण्यापुर्वी गठीत केलेली चौकशी समिती कागदावरच राहीली आहे.

## विद्यापीठात म.फुले आणि डॉ.आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सव

**नांदेड दि.९ –** डॉ.बाबासाहेब आंबेडकर आध्यासन व अभ्यास केंद्र आणि प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

यावर्षी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने दि. ८ ते १४ एप्रिल दरम्यान भारतातील आंबेडकर सामाजिक सप्ताह राबविण्यात येत आहे. याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले असून दि. ११ ते २१ एप्रिल दरम्यान संयुक्त जयंती महोत्सवाच्या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. ११ एप्रिल रोजी फुले-आंबेडकर जयंती महोत्सवाच्या निमित्ताने ज्येष्ठ विधीतज्ञ ॲड. जयमंगल धनराज (मुंबई) व साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक श्रीकांत देशमुख (नांदेड) यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. दु.३ वा. पुणे येथील प्रसिद्ध कवी प्रकाश घोडके यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये डॉ. आदिनाथ इंगोले (नांदेड), डॉ. मुकुंद राजपंखे (आंबाजोगाई), डॉ. विकास कदम (नांदेड), डॉ. अक्षय जाधव (छ. संभाजीनगर) हे कवी सहभागी होणार आहेत. दि. १२ एप्रिल रोजी विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या तळमजल्यावर स. ११ वा. रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

## राष्ट्रवादी (शरदचंद्र) पक्षाला गळती

## उपसरपंच सातव यांचा भाजपात प्रवेश



**किनवट दि.९ (ता.प्र.)–** किनवट, माहूर मतदार संघातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते, माजी आमदार स्व. प्रदीप नाईक यांच्या आकस्मित निधनामुळे राष्ट्रवादी पक्षातील कार्यकर्ते संभ्रमात पडले आहेत. त्यातच आ.भीमराव केराम यांचे विकसनशील नेतृत्व स्वीकारत मोहपुर गावचे उपसरपंच दीपक सातव तसेच प्रवीण सोनटक्के यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. आता राष्ट्रवादी पक्षाच्या गळतीची सुरुवात झाल्याची भावना वर्तुळात उमटत आहे.

मतदार संघाच्या विकासासाठी आमदार भीमराव केराम यांनी करोडोंचा निधी खेचून आणत अनेक विकास कामे मार्गी लावलीत आणि आणखी पक्षाला बळ मिळावे यासाठी आमदार भीमराव केराम यांचे प्रयत्न चालू आहेत. नेतृत्व, संघटन व विकास हा त्रिसूत्री कार्यक्रम हाती घेतल्यामुळे राष्ट्रवादी पक्षातील अनेक कार्यकर्त्यांची भारतीय जनता पार्टीमध्ये येण्याची ओढ निर्माण होत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मोहपूरच्या उपसरपंचाच्या भाजपा पक्षप्रवेशाने ही सुरुवात झाल्याची चर्चा आता वर्तुळात सुरू आहे.

## सम्राट अशोक जयंतीनिमित्त विद्रोही साहित्य संमेलन व प्रबोधनपर व्याख्यानांचे आयोजन

**किनवट दि.९ (ता.प्र.)–** प्रियदर्शी सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त तसेच महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त शिव-शाहू-फुले-आंबेडकर-अण्णाभाऊ विचारमंच, किनवट यांच्या वतीने दोन दिवसीय विद्रोही साहित्य संमेलन व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर संमेलन ११ व १२ एप्रिल २०२५ रोजी किनवट येथे पार पडणार असून, या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अशोक राणा असतील. ११ एप्रिल रोजी सायंकाळी त्यांचे विशेष प्रबोधनपर व्याख्यान होणार असून, १२ एप्रिल रोजी अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. यानंतर १४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत आणखी एक व्याख्यान ठेवण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शासकीय विश्रामगृह, गोकुंदा येथे नुकतीच एक बैठक पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थान प्रा. रामप्रसाद तौर यांनी भूषवले. बैठकीस माजी नगराध्यक्ष इसाखान , सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी आनंदराव वाढे, पत्रकार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष फुलाजी गरड पाटील, प्रा. विजय खुपसे, मुख्याध्यापक मोहन जाधव, प्रा. डॉ. सागर शिल्लेवार, मिलिंद सर्पे, डॉ. वसंत राठोड, प्रा. उमाकांत इंगोले, प्रा. जोगदंड, दादा गोणारकर, उद्धवराव रामतीर्थकर, संदीप कोल्हे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## महाविहार बावरीनगर दाभड येथे ११ मे रोजी सामूहिक बौद्ध मंगल परिणयाचे आयोजन

**नांदेड दि.९ –** येथील शांतीदूत प्रतिष्ठान नांदेडच्यावतीने दि. ११ मे २०२५ रोजी बौद्ध समाजातील वधू-वर यांचा सामूहिक मंगल परिणयाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने नुकतीच अशोक गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी मंगल परिणय संयोजन समितीची स्थापना करण्यात येऊन संयोजन समितीचे पदाधिकार्यांची एकमताने निवड करण्यात आली.



मंगल परिणय संयोजन समितीच्या अध्यक्षपदी गंगाधर सूर्यवंशी दाभडकर, सचिव सुभाष काटकांबळे, उपाध्यक्ष प्रा. बी. एम. वाघमारे सहसचिव डी. डी. भालेराव आदींची निवड जाहीर करण्यात आली. तर उर्वरीत कार्यकारिणी खालील प्रमाणे आहे. स्वागताध्यक्ष एस. टी. पंडित, संघटक अशोक गोडबोले, कोषाध्यक्ष सिद्धोधन मांजरमकर, सहकोषाध्यक्ष एम. पी. गायकवाड आदींची निवड करण्यात आली. सल्लागार म्हणून यशवंतराव गच्चे, बी. जी. पवार, भारत कानिंदे, एल. एन. गर्जे, अशोक गायकवाड, रमेश दुधमल, भय्यासाहेब गोडबोले, जी. बी. सोनकांबळे, हिरामन वाघमारे, साहेबराव पुंडगे यांची निवड करण्यात आली. मंगल परिणय वधू-वर नोंदणीसाठी वधू व वरांचे वयाचे प्रमाणपत्र, रहिवासी, जातीचे, प्रथम विवाह असल्याचे प्रमाणपत्र व रंगीत पासपोर्ट पाच छायाचित्रे, आदी कागदपत्रे पूज्यनीय भदंत बुद्धभुषण महाविहार बावरीनगर, दाभड, डी. पी. गायकवाड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जी. जी. कोलत्ते, शिवाजी सोनकांबळे, जनार्दन जमदाडे, एम. जी. बादलगावकर, भगवान गायकवाड आदींनी केले आहे.

## तालूका पथकाद्वारे वानेगाव शाळेच्या भौतिक सुविधांची पाहणी

**नांदेड दि.९ –**तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये, शालेय भौतिक सोई - सुविधा उपलब्ध आहेत का ? त्या भौतिक सुविधांचा योग्य वापर आहे का ? भौतिक सुविधांची कमतरता तर नाही ना ? अशा अनेक महत्त्वपूर्ण प्रश्नावलींने तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची पाहणी करण्यासाठी तहसीलदार, गट विकास अधिकारी , गट शिक्षणाधिकारी , अभियंता, मंडळ अधिकारी व पोलीस अधिकारी इ.अधिकाऱ्यांची तालुका समिती तयार करण्यात आली आहे. या समितीकडून शाळांतील विविध भौतिक सोई सुविधांची बारकाईने तपासणी पाहणी केली जात आहे.

## डाकघर अधिक्षक कार्यालयात २५ एप्रिल रोजी विमा सल्लागार पदाच्या मुलाखती

**नांदेड दि.९–** डाक विभागाकडून डाक जीवन विमा (पीएलआय) आणि ग्रामीण डाक जीवन विमा (आरपीएलआय) योजने अंतर्गत ''डायरेक्ट एजंट'' (विमा सल्लागार) च्या भर्तीसाठी मुलाखती घेण्यात येत आहेत. यासाठी अर्ज अधिक्षक डाकघर कार्यालयात उपलब्ध आहेत. इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज भरुन २५ एप्रिल २०२५ रोजी कार्यालयीन वेळेत अधिक्षक डाकघर, नांदेड विभाग,नांदेड येथे मुलाखतीसाठी स्वखर्चाने यावे. सोबत बायोडाटा, मूळ कागदपत्र, प्रमाणपत्र / अनुभव प्रमाणपत्र घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन नांदेड विभागाचे अधिक्षक डाकघर यांनी केले आहे.

पीएलआय व आरपीएल योजनेच्या एजंट विमा सल्लागार या पदासाठी पात्रता व मापदंड पुढीलप्रमाणे आहे. उमेदवाराचे वय मुलाखतीच्या दिवशी कमीत कमी १८ असावे. शैक्षणिक पात्रतेत अर्जदार हा केंद्र किंवा राज्य शासनाद्वारे मान्यताप्राप्त बोर्डाची १० वी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केलेली असावा. श्रेणी- बेरोजगार, स्वयं बेरोजगार, माजी विमा सल्लागार, कोणत्याही विमा कंपनीचा माजी विमा एजंट, माजी सैनिक, सेवानिवृत्त शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्ते, महिला मंडळ कार्यकर्ते, ग्राम प्रधान, ग्राम पंचायत सदस्य इ. टपाल जीवन विमा प्रतिनिधीसाठी थेट असे अर्ज करू शकतात.

## इंदिरा गांधी महाविद्यालयात विद्यापीठ परीक्षा सुरळीत

**नांदेड दि.९ –** श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडको नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठच्या उन्हाळी परीक्षा सुरू आहेत.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दुर्गेश रवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा केंद्र प्रमुख प्रा.बी.ए.राठोड, सह केंद्रप्रमुख साहित्यिक डॉ. शंकर विभुते, संयुक्त केंद्र प्रमुख डॉ.एम.आर.जोशी कार्यरत आहेत.



या केंद्रावर वसंतराव काळे महाविद्यालय नांदेड, गुरू गोविंदसिंगजी महाविद्यालय झरी,कै.बाबाराव इंजेवाड महाविद्यालय वाघाळा, शिवशक्ती महाविद्यालय काकांडी,विश्वभारती महाविद्यालय सिडको येथील जवळपास एक हजार विद्यार्थी परीक्षा देत आहेत. परीक्षा सुरळीतपणे पार पडण्यासाठी कार्यालयीन प्रमुख वडवळे, प्रकाश हंबर्डे, संजय कळगावकर, मनोज पवार, विठ्ठल पुयड, संजय एलसटवार कार्यरत आहेत.परीक्षेत गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळ व दुपार महाविद्यालयीन दक्षता पथक नेमण्यात आली असून या टीममध्ये डॉ.बाबुराव घायाळ, डॉ.नामदेव वाघमारे, डॉ.एफ.एम.सौदागर, डॉ.मिर्झा एस.बी. डॉ.जी.एस. पाटील, डॉ.मिंलीद लोखंडे, डॉ.राम मेटकर, डॉ.बायस यु.ई. डॉ.लक्ष्मण काळे, डॉ. आर.बी.पाटील, डॉ.हरिहार मोहोकार, डॉ.राजकुमार पवळे, डॉ.केदार सोळुंके, डॉ.विशाल मस्के, डॉ.सुमंत तुगावकर, डॉ.डी.बी.कदम, डॉ.हनुमंत भोपाळे, डॉ.भागवत पस्तापुरे, डॉ. जी.एस.भोपाळकर, डॉ.काजी फरिन आदी कामे करत आहेत.परीक्षा केंद्रास स्वा.रा.ती.म.वि.येथील व्यवस्थापन परिषद सदस्य इंजि.नारायण महादेवराव चौधरी यांनी परीक्षा विभागात भेट देऊन समाधान व्यक्त केले.

## पंचकुंडात्मक श्री गणेश पंचायतन महायज्ञाचे आयोजन

**नांदेड दि.९ –**शहरातील रेणुकादेवी मंदिराजवळील, वामननगर स्थित श्री याज्ञवल्क्य काण्व वेदपाठशाळेचा २१ वा वर्धापनदिन सोहळा १६ एप्रिल ते १८ एप्रिल या दरम्यान मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. श्री महर्षी याज्ञवल्क्य सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात विविध धार्मिक आणि अध्यात्मिक प्रवचनाच्या कार्यक्रमांचे आयोजन शहरातील पंचमुखी हनुमान मंदिर प्रांगण, गणेशनगर येथे करण्यात आले आहे.

बुधवार दि. १६ एप्रिल रोजी सकाळी नऊ ते साडेदहा या वेळेमध्ये वैदिक मंगलाचरण ह.भ.प. शरदचंद्र महाराज देगलूरकर, भागवताचार्य ह.भ.प. बा.ल.चोथवे महाराज, ह. भ. प. रामकृष्ण गोविंद जामकर यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला डॉ उमेश भालेराव, भार्गव राजे, विजय गंभीरे, संतोष कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

## चोखोबा पहेलवान हे आंबेडकरी चळवळीचे आधारवड - ॲड.मोरे



**नांदेड दि.९ –** शहरातील जुन्या पिढीतील चोखोबा पहेलवान जोंधळे हे एके काळी आंबेडकरी चळवळीचे आधारवड होते,असे प्रतिपादन ॲड.यशवंतराव मोरे यांनी केले.

का. चोखोबा पहेलवान जोंधळे यांच्या स्मृतिदिन भीम आर्मीच्यावतीने महात्मा फुले वाचन कट्टा आय टी आय जवळ येथे मंगळवारी साजरा करण्यात आला.यावेळी ते बोलत होते.

यावेळी भीम शक्तीचे जिल्हाध्यक्ष सुरेश हटकर,श्याम निलंगेकर ,रोहन कहाळेकर, जयदीप पैठणे, भिवाजी वाघमारे, गंगाधर वडणे,मधुकर हणमंते, सत्यपाल नरवाडे यांनी अभिवादन केले.या कार्यक्रमाचे नियोजन भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष किरण सदावर्ते आणि विक्रांत बिऱ्हाडे यांनी केले.

# जातीय सलोखा व बंधुभाव वाढविण्यासाठी जिजाऊ रथयात्रा

## प्रा.अर्जुन तनपुरे यांचे प्रतिपादन

**मुखेड दि.९(ता.प्र.)–**राज्यामध्ये सध्या परिस्थितीत जातीयवाद दिवसेंदिवस तरी वाढत चालली असून ती दरी कमी करण्यासाठी आणि जातीय सलोखा राखून बंधूभाव वाढीसाठी क्रांतीपुरुष पुरुषोत्तमजी खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिजाऊ रथयात्रा राज्यभर मार्गक्रमण आणि विचार मंथन करीत आहे.

मराठा सेवा संघाच्या वतीने मराठा जोडो अभियान हे ब्रीद घेऊन आयोजित करण्यात आलेल्या जिजाऊ रथयात्रेचे आगमन रविवारी मुखेडमध्ये झाले. यावेळी कंधारफाटा ते गरुडकर पेट्रोलपंप नरसी रोड पर्यंत मुख्य रस्त्यावर स्वागतासाठी सतरा कमानी उभारण्यात आल्या होत्या. त्यावर विविध समाज बांधवांनी जिजाऊ रथयात्रेला बॅनरव्दारे शुभेच्छा दिल्या. तालुक्यातील बहुसंख्येनी जमलेल्या मराठा बांधवांनी सायंकाळी ७ वाजता जिजाऊ रथयात्रेचे मुखेड-कंधार फाटा येथे फटाके वाजवून जंगी स्वागत केले. डोक्याला भगवी फेटे बांधून, असेल त्या दुचाकी, चार चाकी तर काही पायी शहरातील मुख्य रस्त्याने निघालेली जिजाऊ रथयात्रा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या ठिकाणी येऊन थांबली. याच ठिकाणी आयोजित सभेत उपस्थित राज्यातून व नांदेड, कंधार, देगलूर व मुखेड परिसरातील मराठा सेवासंघ , जिजाऊ ब्रिग्रेड , छत्रपती संभाजी ब्रिग्रेड या विविध संघटनेचे पदाधिकारी यांचा मुखेड मराठा सेवा संघाच्यावतीने ग्रंथ, जिजाऊ कॅलेंडर, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याचवेळी छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार घालून सभेला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचा प्रारंभ जिजाऊ वंदनेने झाला.

ही यात्रा १८ मार्च रोजी वेरुळ येथील भोसले गढी येथून प्रारंभ झालेली ही यात्रा १ मे रोजी पुण्यातील लाल महाल येथे कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त समारोपास पोहोचेल. मुखेड मध्ये छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर या महामानवांना अभिवादन करून रथयात्रेचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून तालुकाध्यक्ष यशवंत बोडके यांनी युवकांनी अंगातील मरगळ झटकून समाजसेवेसाठी कामाला लागले पाहिजे असे कार्यकर्त्यांना आवाहन केले.

यावेळी संभाजी ब्रिग्रेड प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. गजानन पारधी, प्रदेश संघटक उमाकांत उपाडे , मराठा सेवासंघाचे मार्गदर्शक शे.रा.पाटील, विभागीय कार्याध्यक्ष व्ही.टी. शिंदे आदी पदाधिकारी मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बालाजी पा. इंगोले यांनी केले. यावेळी मुखेड व परिसरातील मराठा बांधव बहुसंख्येनी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सदाशिवराव पाटील, यशवंतराव बोडके, विश्वंभर पाटील, गंगाधरराव पाटील, गजानन पाटील शिरूरकर, शिवाजीराव इंगोले, बालाजीराव इंगोले, ज्ञानोबा जोगदंड, बापूसाहेब वडजे, किशनराव इंगोले, भागवत पाटील बेळीकर, शिवकुमार बिरादार, पंडित पाटील बेळीकर, बालाजीराव ढोसणे, रामदास पाटील, रामेश्वर पाटील इंगोले, दिगंबर जाधव शरद पाटील, श्रीनिवास माने आदींसह मराठा बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

**Change in Name**

My old name is BAIG IRFAN AHEMAD JAMEEL AHEMAD which I am changing as new name MIRZA IRFAN AHMED BAIG Hebce forth my all correspondence will be done as per my new please consider the same.

Address
H.No.1/21/94
Nandigram Housing Society, Over Bridge
Nagpur Road, Nanded,
Nanded Maharashtra - 431602
Mobail No.9579977795

**Change in Name**

My old name is SHARADA ANIL KUMAR KATHALE which I am changing as new name SHARDA ANIL KATHALE Hebce forth my all correspondence will be done as per my new please consider the same.

Address
Anil Kathale Pushkar Purna Road
Wadi Bk. Chatrapati Nagar Taroda Bk. Pin
code 431605 Pos. Taroda Bk.
Dist Nanded Maharashtra
Mobail No.9421956728

**सुविचार**

दृष्टिकोन खूप छोटी गोष्ट आहे
मात्र त्यामध्ये जीवन बदलावण्याचे सामर्थ्य आहे.

संपादकीय

## प्रयत्ने वाळूचे कण रगडिता...।।

**बांधकाम** दर्जाच्या वाळूची वाढती मागणी ही जगभरातील पर्यावरणीय समस्या आहे. आणि या समस्येवर अनेक देश मार्गही काढत आहेत. तथापि, अद्यापही यावर कोणीही प्रभावी उपाय शोधू शकला नाही. दुसरीकडे वाळू उत्खननाच्या प्रकारामुळे पर्यावरणावर होणारे परिणाम तर आहेतच शिवाय यामुळे भौतिक, जैविक, रासायनिक आणि मानवनिर्मित पर्यावरणावर परिणाम होत आहेत याकडे आपण सोयीस्कर दुर्लक्ष करत आहोत. आज सुरु असलेल्या वाळूचा अमर्याद उपसा आणि बांधकाम दर्जाच्या वाळूची वाढलेली प्रचंड मागणी लक्षात घेतली तर २०५० पर्यंत जगात या संसाधनाचा (वाळूचा) शेवट होण्याचा धोका पर्यावरणतज्ज्ञांनी आधीच व्यक्त केला आहे. दुर्दैवाने, अनेक देशांमध्ये वाळूखाण नियमन धोरणांचा अभाव आहे आणि वाढत्या मागणीमुळे अविवेकी आणि बेकायदेशीर खाणकामावर नियंत्रण ठेवणेही दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकार गेल्या काही महिन्यांपासून नवे वाळू धोरण तयार करत होते. त्याला आता मूर्त रुप आले आहे आणि राज्य मंत्रिमंडळाने या नव्या वाळू धोरणाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार आता विविध योजनांमधील राज्यातील घरकूल लाभार्थीसाठी पाच ब्रासपर्यंत मोफत वाळू उपलब्ध करून देणे, नदी-खाडीपात्रातील वाळूचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन विक्री (डेपो पद्धती) ऐवजी लिलाव पद्धतीद्वारे करण्याला मान्यता देण्यात आली आहे. नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुटवडा विचारात घेऊन बांधकामात कृत्रिम वाळूचा वापर वाढावा यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल. यासाठी सुरुवातीला विविध शासकीय, निमशासकीय बांधकामांमध्ये २० टक्के कृत्रिम वाळू वापरणे बंधनकारक करण्यात येईल. या बांधकामांत पुढील तीन वर्षांत कृत्रिम वाळू बंधनकारक करण्यात येणार आहे. या धोरणानुसार आता पर्यावरण विभागाच्या परवानगीनंतर नदीपात्रातील वाळू गटांसाठी जिल्ह्यातील प्रत्येक उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वाळू गटांचा एकत्रित एकच ई-लिलाव प्रसिद्ध करण्यात येईल. या लिलावाचा कालावधी दोन वर्षांसाठी राहणार आहे. खाडीपात्रातील वाळू गटांसाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने निश्चित केलेल्या प्रत्येक वाळू गटासाठी ई-लिलाव पद्धतीने कार्यवाही करण्यात येईल. या लिलावाचा कालावधी तीन वर्षे राहील. लिलावाद्वारे उत्खनन करण्यात येणाऱ्या प्रत्येक वाळू गटामधील १० टक्के वाळू विविध घरकुल लाभार्थीसाठी पाच ब्रासपर्यंत मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या अधिसूचनेत निश्चित केलेले वाळूगट तसेच ज्या वाळू गटांना पर्यावरण विभागाची परवानगी मिळालेली नाही व जे वाळूगट लिलावात गेलेले नाहीत अशा नदी, नाले, ओढे वाळू गटातील वाळू शासनाच्या गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थी, गावकऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक व सामूहिक कामासाठी तसेच शेतकऱ्यांना त्याच्या स्वत:च्या विहिरीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्याबरोबरच वाळूचा अमर्याद उपसा थांबवून नदीपात्रांची होणारी हानी रोखणे हा या नव्या धोरणाचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळेच नैसर्गिक वाळूऐवजी कृत्रिम वाळूचा वापर वाढवला जाणार आहे. सुरुवातीला ही कृत्रिम वाळू शासकीय बांधकामात वापरली जाईल. त्यानंतर हळूहळू खासगी बांधकाम करणारे सुद्धा याकडे आकृष्ट होतील आणि नदी पात्रातील वाळूची मागणीही आपोआप कमी होईल. मात्र, यासाठी सगळ्यांनाच पुढाकार घेणे आवश्यक आहे. केवळ सरकारने धोरण आखले म्हणून नाही तर सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन अशा निर्णयांकडे पाहिले पाहिजे. बांधकामात वाळूची निवड अत्यंत महत्त्वाची असते. कारण ती बांधकामाच्या गुणवत्तेवर आणि टिकाऊपणावर परिणाम करते. नदीची वाळू बांधकामासाठी वापरण्यास प्राधान्य दिले जात असले तरी बहुतेक राज्यांमध्ये ती आता पूर्वीसारखी मुबलक प्रमाणात उपलब्ध नाही. बहुतेक राज्यांमध्ये सरकारने नदीच्या वाळूवर बंदी घातली आहे. त्यामुळे सर्वात योग्य आणि पसंतीची वाळू म्हणून उत्पादित वाळू-कॉंक्रीट वाळूकडे पाहिले जात आहे. एम सँड, ज्याला उत्पादित वाळू म्हणूनही ओळखले जाते, ही एक कृत्रिम वाळू आहे जी कठीण दगड चिरडून आणि त्यांना व्हीएसआय (व्हर्टिकल शाफ्ट इम्पॅक्ट) मशीनमधून वळवून लहान वाळूच्या आकाराचे कण तयार करून तयार केली जाते. बांधकामासाठी नैसर्गिक नदीच्या वाळूच्या कमतरतेवर उपाय म्हणून एम-सँडचा उगम झाला आहे. बांधकाम साहित्याची वाढती मागणी आणि पर्यावरणीय परिणामांबद्दलच्या चिंतेला प्रतिसाद म्हणून पारंपरिक वाळूला पर्याय म्हणून अशी वाळू प्रथम तामिळनाडू आणि केरळमध्ये वापरण्यास सुरुवात झाली. कालांतराने, बांधकाम आणि कॉंक्रीट मिक्सिंगसाठी एक व्यवहार्य पर्याय म्हणून देशात अनेक ठिकाणी या कृत्रिम वाळूचा उपयोग केला जात आहे. कृत्रिम वाळूपासून तयार होणारे कॉंक्रिट आणि मॉर्टर नैसर्गिक वाळूपासून तयार झालेल्या किंबहुना काही परिस्थितीत त्याहीपेक्षा जास्त मजबुती देणारे असते. नैसर्गिक वाळू गोलाकार तर कृत्रिम वाळूचे कण साधारण त्रिकोणाकृती असतात. यामुळे बांधकामांत घट्टपणा येतो. ती अधिक मजबुतीने चिकटली जाते. त्यामुळे नैसर्गिक वाळूचा बांधकामातील उपयोग कमी करून त्याऐवजी कृत्रिम वाळूचा वापर वाढवणे आवश्यक ठरते, असे तज्ज्ञांकडून सांगितले जाते. महत्वाचे म्हणजे कृत्रिम वाळू सहजतेने आणि मुबलक प्रमाणात बाजारपेठेत उपलब्ध आहे. बरेचदा ती नैसर्गिक वाळूपेक्षा स्वस्त असते. त्यामुळे नागरिकांनी बांधकामासाठी नदीच्या वाळूबाबतचा आग्रह सोडून पर्यायी कृत्रिम वाळूचा उपयोग केल्यास आपण निसर्गाचे जतन करू शकतो आणि वाळूटंचाईवर मात करू शकतो. यासाठी जागरुकता निर्माण करण्याची गरज आहे. किंबहुना ती काळाची गरज आहे. शेवटी, वाळू उत्खननाचा व्यवसाय अनेकदा बदनामीचा ठरतो. वाळूची कमतरता वाढत असताना, प्रति घनमीटर किंमत वाढते आणि वाळू बेकायदेशीर उत्खनन आणि व्यापाराला एक प्रकारे प्रोत्साहन देते. एका अभ्यासानुसार सध्या, दरवर्षी सुमारे ५० अब्ज टन वाळू वापरली जाते आणि ती त्याच काळात निसर्गाने उत्पादित केलेल्या वाळूच्या दुप्पट आहे. सध्याच्या अतिरेकी वापर होत असलेल्या गाळाच्या साठ्यात भर घालण्यासाठी पृथ्वीला हजारो वर्षे लागतात. दुर्दैवाने आपण करत असलेल्या सध्याच्या उत्खनन वेगाने वाळूचा उपसा करत राहिलो तर जगात २०५० पर्यंत वाळू संपू शकते. त्यामुळे अर्थात नद्यांचे अस्तित्व सुद्धा धोक्यात येईल. हे लक्षात घेतले तर सावध ऐका पुढल्या हाका या उक्तीप्रमाणे प्रत्येकाने सावध व्हावे एवढीच अपेक्षा.

हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक शिवानंद दिंगबरराव महाजन द्वारा प्रकाशित आणि मुद्रक संदीप विलासराव पाटील, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२

**संपादक : शिवानंद दिगंबरराव महाजन**

**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**

या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.

https://epaper.esatyaprabha.com

र.क्रं.२७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०

e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

# संकल्पाचे मुकुटमणी महावीर



**प्रासंगिक**

जैन धर्माचे चोवीसावे तीर्थंकर वर्धमान महावीर त्या महान धर्मपुरुषांपैकी होते. ज्यांनी धर्माला वैज्ञानिक दृष्टिकोन दिला. त्यांची पद्धती विश्लेषणाची पद्धती होती. गूढ तात्त्विक चिंतनाला त्यांनी गणितीय समीकरणासारखे उलगडून सोपा धर्म सांगितला. त्यांनी सांगितलेल्या सहा लेश्या आणि चौदा गुणस्थान वैज्ञानिक रितीने मांडलेली साधना पद्धती आहे. त्यांनी सांगितले आहे, मनुष्य कर्माचा प्रभाव त्याच्या आत्म्यावर वृत्तींच्या रूपाने होतो. त्यालाच त्यांनी लेश्या अशी संज्ञा दिली आहे.

महावीरांनी आपल्या प्रवचनांमध्ये बोधकथांचा क्वचितच उपयोग केलेला आहे. पण लेश्या काय आहे, हे स्पष्ट करण्याकरिता त्यांनी खूपच चांगली बोधकथा सांगितली आहे. ते सांगतात, 'सहा पथिक होते. ते एका जंगलात रस्ता हरवून बसले. पुष्कळ वेळ रस्त्याच्या शोधात भटकत राहिल्याने ते भूकेने व्याकूळ झाले. त्यांना फळांनी बहरलेले एक झाड दिसल्याने फळं खाण्याची इच्छा झाली. ते मनात विचार करायला लागले. एकाने विचार केला की झाडाला मुळासकट कापून टाकीन म्हणजे फळं खायला मिळतील. दुस-याने विचार केला की फक्त खोड कापलं तरी फळं मिळतील. तिस-याने विचार केला की फक्त फळं असलेली फांदी तोडली तरी आपले काम होईल. चौथ्याचा विचार होता की ज्या देठाला फळ लागलं आहे ते तोडले तर आपली भूक भागेल.

पाचवा फक्त फळ तोडण्याच्या विचारात होता. सहाव्याचे मत होते की, झाडाला लागलेले फळ जेव्हा पिकून पडेल तेव्हा त्याला खाणे योग्य असेल. या सहा पथिकांचे विचार, वाणी आणि कर्म सहा लेश्यांचे उदाहरण आहे. पहिला पथिक कृष्ण लेश्याच्या खाली झाकोळलेला आहे. हा थोड्या वेळची भूक भागवायला झाडालाच कापायला उठला आहे. भूक काही नेहमीकरता भागणार नाही. पण तेवढ्यासाठी तो झाडालाच नष्ट करायला मागेपुढे पाहात नाही. अशा व्यक्ती फक्त स्वत:च्या सुखापुरताच विचार करतात. पुढल्या चार पथिकांचा विचार पण फार काही वेगळा नाही.

महावीर म्हणतात की, सहावा पथिक श्वेत लेश्यापर्यंत पोचलेला मनुष्य आहे. तो म्हणतो जर हे जीवन फुकटात मिळाले आहे तर खायला का नाही मिळणार. महावीरांचं पूर्ण जीवन असेच होते. जेव्हा त्यांना भूक लागायची ते गावात यायचे. पण मागितले आणि कोणाला द्यायचे नसेल तर ती बळजबरी ठरेल. भिक्षा मागायची नाही, पण हे नक्की कसे ठरवायचे. तर ते सकाळीच काही संकल्प करायचे. जसे, मुलाला घेऊन घराच्या उंबरठ्यावर उभी असलेली महिला म्हणेल की, 'या महाराज आमच्या घरी जेवा' तेव्हाच जेवेन.

एकदा त्यांनी संकल्प घेतला की, मी अशा घरातून भिक्षा स्वीकारीन ज्या घराच्या दारासमोर शिंगावर गूळ लागलेली गाय उभी असेल. ते रोज गावात जायचे आणि चक्कर मारून परत यायचे. ग्रामवासी हळहळत होते की, महावीरांचा कोणतातरी संकल्प पूर्ण होत नाहीये. ते त्यांना जेवायला घालायला तयार होते. पण महावीर संकल्प पूर्तीची वाट पाहात होते. शेवटी दोन महिन्यांनंतर एका बैलगाडीत गूळ लादलेला होता. एक गाय गूळ खायला पुढे आली तेव्हा तिच्या शिंगाला गूळ लागल्यावर ती एका घरापुढे उभी राहिली. त्यामुळे महावीरांचा संकल्प पूर्ण झाला, मगच त्यांनी भोजन केले. महावीर म्हणायचे, जेव्हा ज्या वस्तूची गरज असेल ती मिळेल. मागू नका. मागून स्वत:ला दीन बनवू नका.

**पुणे येथील नामांकित दीनानाथ मंगेशकर धर्मदाय रुग्णालयाने भाजपाचे विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक सुशांत भिसे यांच्या गर्भवती पत्नी तनिषा भिसे या प्रसुतीसाठी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल होण्यासाठी आल्या असता त्यांना आधी दहा लाख रुपये अनामत भरा अशी अमानवी आणि संतापजनक वागणूक दिल्याने उपचाराअभावी तनिषा भिसे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि पुण्यासारख्या सुसंस्कृत, उच्च शिक्षित आणि पुरोगामी म्हणून गौरविल्या जाणाऱ्या शहरात माणुसकी, मानवता, माणसातील संवेदना या किती बोथट झाल्या आहेत हे अत्यंत प्रकर्षाने समोर आले.**



# उपचार हाच मूलभूत अधिकार

**– सुनील जावडेकर**

राज्यातील सरकारी, खासगी, धर्मादाय, कॉर्पोरेट्स अशा रुग्णालयांमधील रुग्णांना भेडसावणाऱ्या समस्या मोठ्या प्रमाणावर उघड झाल्या आहेत. या सर्व घटनेवर बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याकरिता राज्य सरकारच्या वतीने समिती स्थापन केली आहे. ही समिती या संपूर्ण घटनेची सविस्तर चौकशी करेल आणि त्यानंतर आपला अहवाल राज्य सरकार पुढे सादर करील. त्यातून जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर राज्य सरकार कारवाई देखील करेल अथवा चौकशीत जर काही निष्पन्न झाले नाही, तर कोणावर कारवाई होणार देखील नाही. तथापि या घटनेच्या निमित्ताने राज्यातील रुग्णालयीन व्यवस्थांवर आणि या रुग्णालयांच्या माध्यमातून आकारल्या जाणाऱ्या महागड्या उपचारांबद्दल सर्वसामान्य जनतेमध्ये जो काही एक रोष व्यक्त होत आहे, त्या रोषाची गंभीर दखल राज्य सरकारने घेतली पाहिजे आणि केवळ राज्य सरकारने गंभीर दखल घेऊन चालणार नाही, तर राज्यांमध्ये जी खासगी रुग्णालय आहेत, धर्मादाय रुग्णालय आहेत तसेच जी मोठी सरकारी रुग्णालय आहेत अशा सर्वच रुग्णालयांनी या घटनेतून बोध घेणे गरजेचे आहे.

मुळात जर या प्रश्नाच्या खोलवर जायचे असेल, तर त्याकरता एक गोष्ट गांभीर्याने लक्षात घेतली पाहिजे ती केंद्र सरकारने आणि त्याचबरोबर राज्य सरकारने देखील ती म्हणजे ज्याप्रमाणे भारतीय घटनेने काही मूलभूत अधिकार हे भारतीय नागरिकांना दिलेले आहेत त्या मूलभूत अधिकारांमध्ये रुग्णालयीन उपचाराचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून समाविष्ट होण्याची नितांत गरज आहे. भारतीय राज्यघटना ही आपल्याला जगण्याचा मूलभूत अधिकार देते, शिक्षणाचा मूलभूत अधिकार देते, माहिती मिळवण्याचा मूलभूत अधिकार देते, त्याचबरोबर अन्न मिळवण्याचा मूलभूत अधिकार देते, धर्म स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार देते. त्याचबरोबर राईट टू ट्रीटमेंट अर्थात रुग्णालयीन उपचाराचा हक्क हा मूलभूत अधिकार म्हणून समाविष्ट होणे ही या पुढच्या काळाची खरी गरज आहे. दोनच वर्षांपूर्वी आपण कोविडसारख्या जीवघेण्या साथीचा अनुभव घेतला आहे आणि त्यामध्ये जे काही जीव गेले तेही पाहिले आहेत. हे जर सर्व लक्षात घेतलं तर या पुढच्या काळात जगात देशात आणि राज्यात आरोग्याबाबत कधीही आणीबाणीसारखी परिस्थिती उद्भवू शकते हे लक्षात घेऊन त्या दृष्टीने केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी याआधीच त्यासाठी सज्ज राहिले पाहिजे. रुग्णालयीन उपचारांचा अधिकार हा जर का मूलभूत अधिकार म्हणून समाविष्ट झाला, तर त्याचा रुग्णाला मोठ्या प्रमाणावर फायदा होईलच मात्र त्याचबरोबर आरोग्य व्यवस्थेमध्ये जी काही एक अनागोंदी आहे या अनागोंदीला नियंत्रणात आणणे, चाप लावणे हे देखील केंद्र आणि राज्य सरकारला शक्य होणार आहे. राज्यात आणि देशभरात जी खासगी रुग्णालय दिवसेंदिवस फोफावत आहेत त्यांच्यावर देखील कोठेतरी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचे काही प्रमाणात का होईना नियंत्रण असणे हे देखील अत्यंत गरजेचे आहे. पुणे येथील तनिषा भिसे घटनेमध्ये मुख्यमंत्री वैद्यकीय कक्षाने प्रयत्न करून देखील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या व्यवस्थापनाने यातील स्वत:ची आडमुठी भूमिका ही कायम ठेवली हे सर्वात दुर्दैवी आहे. जर मुख्यमंत्री वैद्यकीय पक्षाच्या प्रमुखांनी सांगून देखील धर्मदाय रुग्णालय ऐकत नसतील, तर शेवटी सर्वसामान्य जनतेने अशा संकटकाळात जायचे तरी कोणाकडे हा एक मोठा प्रश्न आहे.

याबरोबरच एक आणखीन महत्त्वाची गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे ती म्हणजे ज्याप्रमाणे रुग्णाच्या उपचाराचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून त्याला स्थान मिळावे असे एकीकडे म्हणत असताना दुसरीकडे रुग्णांच्या उपचारासाठी रुग्णालयांना जो काही खर्च येतो त्यासाठी जर प्रत्येक नागरिकाला आरोग्य विमा बंधनकारक आणि सक्तीचा केला, तर त्या माध्यमातून देखील रुग्णालयांना भेडसावणाऱ्या अडचणीवर देखील मात होऊ शकेल आणि त्याचबरोबर रुग्णांवरती दर्जेदार उपचार देखील होऊ शकतील. जर राज्य सरकार राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा योजना आणू शकते आणि त्याची यशस्वी अंमलबजावणी करू शकते तर राज्यातील नागरिकांसाठी अशी एक प्रोत्साहनात्मक आरोग्य विमा योजना राज्य सरकार का आणू शकत नाही याचाही विचार राज्याच्या आरोग्य खात्याने तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राधान्याने करण्याची गरज आहे. अर्थात यामध्ये केंद्र सरकारची आयुष्मान भारत योजना आहे. तसेच राज्य सरकारची महात्मा फुले आरोग्यदायी योजना आहे. या दोन योजना या प्रामुख्याने सरकारी रुग्णालयांमध्ये आणि त्याचबरोबर जी रुग्णालय या योजना राबू इच्छितात अशा खाजगी रुग्णालयांमध्ये या दोन्ही योजना कार्यान्वित आहेत यात संशयच नाही. यामध्ये पाच लाखांपर्यंतचे उपचार हे या दोन्ही योजनांच्या माध्यमातून मोफत केले जातात आणि त्याचा आजवर राज्यातील लाखो गरजू रुग्णांनी लाभ देखील करून घेतलेला आहे हे देखील नाकारण्याचे काही कारण नाही. तथापि याबरोबरच जर रुग्णांनी उपचार नेमके कोठे घ्यावेत? सरकारी रुग्णालयामध्ये घ्यावेत की खासगी रुग्णालयातून या दोन्ही योजनांचा लाभ घेऊन त्याद्वारे घ्यावेत की, मग बड्या नामांकित रुग्णालयांमध्ये घ्यावेत असे स्वातंत्र्य जरी रुग्णाला असले तरी शेवटी हे त्याच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून असते आणि अशावेळी जर किमान पाच लाखांपर्यंतचे आरोग्य विमा कवच प्रत्येक नागरिकाला त्याच्या रुग्णालयीन उपचारांसाठी उपलब्ध होऊ शकले तर पैसे नाहीत म्हणून रुग्णांवरती उपचारच नाकारण्याचा प्रकार किमान यापुढे तरी कोणत्याही रुग्णालयांमध्ये घडणार नाही.

अर्थात तनिषा भिसे घटनेनंतर पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने जे निवेदन प्रसिद्ध केले आहे. त्यामध्ये रुग्णालय प्रशासनाने एक मोठा निर्णय घेतला आहे की, ज्यामध्ये आता यापुढे कोणत्याही रुग्णावर उपचार करण्यापूर्वी त्याच्याकडून कोणतीही अनामत रक्कम घेतली जाणार नसल्याचे रुग्णालयाने स्पष्ट केले आहे. पण हा निर्णय घेण्यासाठी देखील तनिषा भिसे यांचा दुर्दैवी मृत्यू व्हावा लागला हे देखील अत्यंत खेदजनक आहे. आणि यासाठी राज्य सरकारने तत्काळ राज्यातील सर्व खासगी, कॉर्पोरेट्स त्याचप्रमाणे धर्मादाय रुग्णालयांना लेखी आदेश देऊन कोणत्याही रुग्णाकडे अथवा रुग्णाच्या नातेवाईकांकडे रुग्णालयात दाखल करण्यासाठी पैसे नाहीत म्हणून रुग्णावर त्यावेळी उपचार नाकारण्यात येऊ नयेत अशी स्पष्ट तंबी देण्याची नितांत गरज आहे. आणि या सर्वांबरोबरच सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्याप्रमाणे सरकारी रुग्णालयांमधील उपचाराचे दर हे निश्चित केलेले असतात त्याचप्रमाणे राज्यामध्ये खासगी व अन्य रुग्णालयांमधील उपचारांचे दर हे हॉस्पिटल निहाय जर राज्य सरकारने निश्चित करून दिले तर कोणत्याही हॉस्पिटलमध्ये उद्या कोणताही रुग्ण जर उपचारासाठी गेला तर त्याला असलेल्या आजारानुसार आणि त्यावर कराव्या लागणाऱ्या उपचारानुसार त्याला किती खर्च येऊ शकतो याचा एक अंदाज हा निश्चितच रुग्णाला तसेच रुग्णाच्या नातेवाईकांना देखील आधी येऊ शकेल की ज्यामुळे त्यांना कोणत्या रुग्णालयात उपचार घेणे शक्य आहे. हे ठरवता येईल. पुण्यातील या दुर्दैवी घटनेच्या निमित्ताने राज्य सरकारने आरोग्य क्षेत्रात जर खरोखरच तळमळीने काम केले आणि काही धोरणात्मक बदल केले, तर निश्चितच आगामी काळात रुग्णालये आणि रुग्णालयीन उपचार यावरून रुग्ण आणि रुग्णालयीन व्यवस्थापन यांच्यात उद्भवणारे वाद, निष्पाप जाणारे जीव हे निश्चितच टाळता येऊ शकतील.

# प...सा...रा...

**– राजश्री वटे**

प पसरलेलं हे कधी
आवरायचं
सा सारं काही इतस्त:
विखुरलंय
रा राहू द्यावं असंच की
आवरायला घ्यावं
माणूस जीवनाचा पसारा
जन्मापासून मरणापर्यंत

जन्म झाला लंगोटा, दुपटे, झबले, टोपडे घरभर बाळाचं लहानपण रांगतं आहे कपड्यांच्या पसाऱ्यात बेबी पावडरच्या सुगंधात!

जरा पाय फुटू द्या घरभर खेळणी व त्यांच्यातील वेगवेगळ्या आवाजाचा टिक टिक टॉक टॉकचा पसारा!

नंतर शाळेचा पसारा तर कित्येक वर्ष मानगुटीवर रेंगाळत असतो गणवेष, पुस्तकं, बुटमोजे, प्रोजेकट्स, पेपर्स, त्यात कंपास बॉक्समधला पसारा तर काही विचारायलाच नको त्यातील अर्ध्या गोष्टींचा कधी वापर सुद्धा झालेला नसतो, पण तो असणं गरजेचं असतं

मग कॉलेजमध्ये कपडे व पुस्तकं यांच्या पसाऱ्याबद्दल तर काही बोलायची सोयच नाही जिकडे खुंटी तिथे कपडे मुलांचे व अभ्यासाची पुस्तकं तर टेबल सोडून सगळीकडे लोळत असतात अभ्यास करणाऱ्या सकट!!

एकदा जबाबदारी खांद्यावर आली की, आफिसमधील फायलींच्या पसाऱ्यातून डोकं वर काढायला फुरसत नसते फायलींच्या पसाऱ्यातून संसाराच्या पसाऱ्यात नुसती ओढाताण असते जीवाची काय करणार विश्व निर्मात्याने एवढा जगभराचा पसारा मांडून ठेवला आहे त्यांच्या पसाऱ्यात स्वत्व शोधत अख्खं आयुष्य संपून जातं आजूबाजूला समाजाचा, नात्यांचा पसारा असल्याशिवाय मात्र जीवनाला काही अर्थ नाही नक्कीच !!

पुरा संसार ही एक पसारा है
''जगीं हा खास वेड्यांचा
पसारा माजला सारा
गमे या भ्रान्त संसारी
ध्रुवाचा 'वेड' हा तारा ''
या विश्वाच्या पसाऱ्यात

''रणदूंदूभी'' या नाटकातलं पद नक्कीच आठवतं!!

पण मजेची गोष्ट ही की हा पसरलेला पसारा आवरायला स्त्री आपलं उभं आयुष्य घालवते

पसरलेलं आवरत जाते, दमते, चिडचिड करते पण पुन्हा नव्या दमानं आवरून घराला घरपण देते

संसार म्हणजे हेच की
एकाने पसरवायचं दुसऱ्याने आवरायचं
मग ते घर असो की मन !!

घराचा पसारा तरी लवकर आवरला जातो पण मनाचा पसारा त्याला तर काही मर्यादाच नाही तिथे सगळं अस्ताव्यस्त

कुठे सुरू होतो अन् कुटे संपतो कुठून सुरुवात करायची
कुठे संपवायची अशक्य!!

स्त्रीच्या सगळ्यात जिव्ह म्हणजे तिची पर्स सगळं सामावलेलं असतं काय नाही मिळ काढताच ते पर्स पाहिजे मग औष मेकअपचं सामा बरंच काही!

जेव्हा ती स्वयंपाकघरात पसारा करत तेव्हाच रुचकर पदार्थ ताटात पडतात ड्रेसिंग टेबलवर सौंदर्य प्रसाधनाचा पसारा करते तेव्हा एक सुंदर स्त्री समोर येते अंगणात रंगाचा पसारा घालतो तेव्हा अप्रतिम रांगोळी साकारते शाई जेव्हा कागदावर अक्षरांचा पसारा घालते तेव्हा कुठे अप्रतिम लिखाणाचा साक्षात्कार होतो



किती पसारा करू तितका कमीच आहे शब्दांचा इथे

जितका आवरू कमीच आहे कारण पुन्हा पुन्हा त्याचं पुन:रुजीवन होणारच

बघा, जमलं तर आवरा
नाहीतर राहू द्या!!

## साठा होतोय झपाट्याने कमी

# तळपत्या उन्हात बाष्पीभवनाला ‘उकळी’!

**पैठण दि. ९ :** तापमानाचा पारा दिवसेंदिवस चढा असल्याने छत्रपती संभाजीनगर शहरासह मराठवाड्यासाठी वरदान असलेल्या जायकवाडी (नाथसागर) प्रकल्पात बाष्पीभवनाचा वेग झपाट्याने वाढत आहे. दरम्यान, गेल्या चार महिन्यांत धरणातील सुमारे साडेचार टीएमसी पाण्यात हवेत विरले आहे.

धरणात सद्यःस्थितीत ५१ टक्के म्हणजे ११११.३७७ दशलक्ष घनमीटर जिवंत पाणीसाठा असला, तरी गेल्या महिन्यापासून तापमान वाढल्यामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढला आहे. दरम्यान, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च या चार महिन्यांचा विचार केल्यास १३०.३८१ दशलक्ष घनमीटर पाणी हवेत विरले आहे.यात डिसेंबर, जानेवारीत भाष्पीभवनाचा वेग कमी होता. तो फेब्रुवारीपासून वाढत गेला. आता उन्हाच्या झळा तीव्र असल्याने वेग वाढता असल्याचे धरण शाखा अभियंता विजय काकडे यांनी सांगितले.बाष्पीभवनामुळे नद्या, जलाशयांतील आणि जमिनीतीलही पाणी कमी होते. मात्र, ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्यामुळे बाष्पीभवनाला रोखता येत नाही. मोठ्या प्रकल्पावर आच्छादन करून बाष्पीभवन रोखण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु, नाथसागर धरणाचा पसारा मोठा असल्याने हे बाष्पीभवन रोखणे शक्य नसल्याचे धरण प्रशासनाने स्पष्ट केले.

बाष्पीभवन म्हणजे द्रवरूप पदार्थाचे उष्णतेमुळे वायुरूप पदार्थात रूपांतर होण्याची प्रक्रिया. ही प्रक्रिया नैसर्गिक असते. द्रवरूप पदार्थातील रेणू सतत फिरत असतात. काही रेणू अधिक वेगाने फिरतात. त्यांचा वेग इतका असतो, की ते द्रवाच्या आकर्षक शक्तीपासून मुक्त होतात आणि हवेत उडून जातात. हे रेणू वायूमध्ये रूपांतरित होतात. त्यानुसार नाथसागर धरणातील पृष्ठभागावरील ११.३६७ दशलक्ष घनमीटर पाणी उष्णतेमुळे हवेत विरले आहे.जायकवाडी धरणात दररोज १७५ दशलक्ष घनमीटर पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. चार



महिन्यांत साडेचार टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन झाले आहे. बाष्पीभवनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कुठलीही यंत्रणा सध्या तरी कार्यान्वित नाही. जायकवाडी धरणाचा परिसर पक्षी अभयारण्य म्हणून शासनाने घोषित असल्यामुळे उपाययोजना करता येत नाही. जायकवाडी धरणाचा पाणी पसारा ३५ हजार हेक्टर क्षेत्र आहे.

## छत्रपती संभाजीनगरचा पारा

# सलग दुसऱ्या दिवशी ४१ अंशांच्या पुढे

**छत्रपती संभाजीनगर दि. ९ :** तीन दिवसांपासून शहर व परिसरावर सूर्य कोपला आहे. रविवारी शहर व परिसराचे कमाल तापमान ४०.२ अंशांवर पोहोचले होते. सोमवारी ४१ अंश कमाल तापमानाची नोंद झाली. तर आज मंगळवारी पारा ४१.६ अंश सेल्सिअसवर पोहचला. आजचे किमान तापमान देखील २६.२ अंश सेल्सिअस असे नोंद झाले. शहराचे तापमान सलग दुसऱ्या दिवशी ४१ अंशांवर पोहचल्याने उष्णतेच्या असह्य झळाने नागरिकांचे हाल झाले.

**मागील चार वर्षांतील एप्रिलमधील तापमान**

**वर्ष................सरासरी कमाल तापमान**

**२०२१............३८ अंश सेल्सिअस**

**२०२२............४१ अंश सेल्सिअस**

**२०२३............३७ अंश सेल्सिअस**

**२०२४............३८ अंश सेल्सिअस**

**एप्रिलमध्ये वाढलेले तापमान**

**तारीख– कमाल–किमान**

**५ एप्रिल – ३९.४ –२२.६**

**६ एप्रिल – ४०.२ –२३.३**

**७ एप्रिल– ४१.०– २४.१**

**८ एप्रिल– ४१.६– २६.२**

मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात उन्हाची तीव्रता वाढली असून पुढील दोन दिवस उष्णतेची लाट असेल, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये सोमवारी एका अंशाची वाढ होत तापमान ४१ अंशावर पोहोचले, जे सरासरीपेक्षा ५ अंशाने अधिक आहे. परिणामी, रात्रीच्या तापमानातही वाढ होत आहे. यंदाच्या उन्हाळ्यातील रेकॉर्ड ब्रेक ४१ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद चिकलठाणा वेधशाळेने सोमवारी घेतली.

## होस्टेलचे छत कोसळले

# सुदैवाने जीवितहानी टळली

**छत्रपती संभाजीनगर दि. ९ :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या (घाटी) विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचे छत अचानक



कोसळल्याची घटना मंगळवारी सायंकाळी घडली. सुदैवाने कोणी जखमी झाले नाही. मात्र या घटनेने विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

वसतिगृहाची इमारत सुमारे ५० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेली असून, जागोजागी दुरवस्था झालेली आहे. वसतिगृहाच्या मोकळ्या जागेतून स्वच्छतागृहाकडे जाणाऱ्या पोर्चच्या भागातील छत अचानक कोसळले. घटनेची माहिती मिळताच अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी तातडीने बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना कळवले. बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत घटनास्थळी त्यांनी भेट देऊन कोसळलेल्या छताचा भाग हटवण्याचे आदेश दिले. त्यानुसार तत्काळ मलबा हटविण्यात आला.कोसळलेल्या छताच्या खालच्या भागाला आधार देण्याचे काम बुधवारी हाती घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाने तात्पुरती व्यवस्था करत सुमारे ८ ते १० विद्यार्थ्यांना इतर मुलांच्या खोल्यांमध्ये राहण्याची सोय उपलब्ध करून दिली. हे वसतिगृह धोकादायक झाल्याने नव्या वसतिगृहाची गरज असल्याचे विद्यार्थ्यांनी म्हटले.दुसऱ्या मजल्यावरील छत कोसळल्याने खालच्या मजल्याच्या छताला तडे गेले. वसतिगृहातील २१९ क्रमांकाच्या खोलीमध्ये पंकज आगळे हे जाऊ शकत नसल्याने त्यांना गावी जाण्यासाठी व नवे कपडे घेण्यासाठी डॉ. सुक्रे यांनी दोन हजार रुपये देत काही अडचणी आल्यास संपर्क साधण्याचे आवाहन केले.

# विद्यार्थ्याचा पिकअप व्हॅनला धडकून मृत्यू; मित्र गंभीर जखमी

**छत्रपती संभाजीनगर दि. ९ :** डी.फार्मसीच्या चौथ्या सत्राची परीक्षा देण्यासाठी महाविद्यालयात जाणाऱ्या यश सुभाष मधुरसे (१९, रा. बिडकीन) या तरुणाचा पिकअप व्हॅनला धडकून मृत्यू झाला. तर त्याचा मित्र ऋषिकेश शिंदे (रा. बिडकीन) हा गंभीर जखमी झाला. मंगळवारी सकाळी ८.३० वाजता हा अपघात घडला.

यश धनेश्वरी महाविद्यालयात डी. फार्मसीच्या द्वितीय वर्षाचा विद्यार्थी होता. रोज बिडकीनवरून तो मित्रासोबत दुचाकीने ये–जा करत होता. सध्या चौथ्या सत्राची परीक्षा सुरू आहे. सकाळी ८ वाजता निघून चित्तेगाव येथून ऋषिकेशला सोबत घेतले. महाविद्यालयाच्या दिशेने जात असताना बडवे कंपनीसमोरील वळणावर अचानक छोटा हत्ती समोर आला. यावेळी दुचाकीचा तोल सुटला व यश थेट पिकअप व्हॅनच्या मागील बाजूने धडकला. स्थानिकांनी धाव घेत दोघांना रुग्णालयात दाखल केले. मात्र, तोपर्यंत यशचा मृत्यू झाला होता. यशच्या अपघाताची माहिती कळताच रुग्णालयात आई, वडील, मोठ्या भावासह महाविद्यालयातील प्राध्यापक, मित्रांची मोठी गर्दी झाली होती.

## संपत्तीचा हव्यासासाठी

# भाच्याने केला मामाचा खून

**छत्रपती संभाजीनगर दि. ९ :** संपत्तीच्या हव्यासातून भाच्यानेच मामाची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. प्रभाकर प्रल्हाद नाईक (८६, रा.कांचननगर) असे मृत व्यक्तीचे नाव असून, २४ मार्च रोजी भाच्याने डोक्यात दगडाने वार केले होते. उपचाराच्या दरम्यान त्यांचा रविवारी सायंकाळी मृत्यू झाला. मारेकरी सचिन सुधाकर जोशी (रा.चेलीपुरा) याला या प्रकरणी अटक केल्याचे साताऱ्याचे निरीक्षक संग्राम ताठे यांनी सांगितले. प्रभाकर यांचा मृत्यू होताच, सचिनवर खुनाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.

## रोहिणा येथे छापा शेतातील शेडमध्ये ड्रग्ज बनविण्याचा धंदा

**चाकूर दि. ९ –**तालुक्यातील रोहिणा येथील एका शेतात ड्रग्ज बनविण्याचा धंदा उघड झाला. दरम्यान, मुंबईत दाखल गुन्ह्याच्या तपासात ही बाब पुढे आली. दरम्यान, महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) पथकाने छापा टाकून संशयितास पकडले.

आमली पदार्थविरोधी कायद्यानुसार मुंबई येथे दाखल असलेल्या गुन्ह्यातील संशयित रोहिणा (ता. चाकूर) येथे असल्याचे महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकास कळाले.त्यावरून मंगळवारी (ता. आठ) पथकाने रोहिणा येथे छापा टाकला. त्यात येथील एका शेतात असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये ड्रग्ज बनविण्यासाठीचे साहित्य आढळले.

## बांधकाम साईटवर भीषण अपघात

# दोन मजूर ठार, तिघे गंभीर जखमी

**छत्रपती संभाजीनगर दि.९ :** शहरातील बीड बायपासवरील संग्राम नगर उड्डाण पुलाशेजारी सुरू असलेल्या व्यापारी संकुलाच्या (कॅपिटल ट्रेड सेंटर) बांधकाम साईटवर मंगळवारी सकाळी भीषण अपघात घडला. बेसमेंटचे काम सुरू असताना अचानक मुरूम कोसळून दोन मजूर जागीच ठार झाले, तर तिघे गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

सदर संकुलासाठी सुमारे ६० ते ७० फूट खोल खड्डा खोदण्यात आला होता. या खड्ड्यात पायाभरणी आणि बेसमेंटचे काम सुरू होते. मात्र, अचानक आमदार रोडच्या दिशेने असलेला मुरूम ढासळून थेट मजुरांवर कोसळला. यावेळी साईटवर ५ हून अधिक मजूर उपस्थित होते.मुरूमच्या ढिगाऱ्यामुळे दोन मजुरांचा जागीच मृत्यू झाला, तर तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. त्यापैकी दोघांची प्रकृती अत्यवस्थ असून मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.मुरूम थेट लोखंडी गजांवर कोसळल्यामुळे त्याचे तुकडे व दगड मजुरांच्या अंगावर पडले. यामुळे तेथे काम करत असलेले मजूर खाली दाबून अत्यंत गंभीर स्वरूपात जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच छत्रपती संभाजीनगरचे पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला.

# जमीन देण्यास विरोध करत चौघांनी घेतले विष

**अंबाजोगाई दि. ९:** जवळगाव (ता. अंबाजोगाई) येथील गायरानधारकांनी खासगी कंपनीला जमीन देण्यास विरोध केला असून, मंगळवारी (ता. आठ) या जमिनीवर कंपनीने पोलिस बंदोबस्तात काम सुरू करताच चार गायरानधारकांनी विष प्राशन केले. यातील तीन जणांवर स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

जवळगाव येथील सर्व्हे (नं. २११) मधील काही जमीन तेथील लोक अनेक वर्षांपासून कसतात. ही जमीन दोन वर्षांपूर्वी एका कंपनीला सोलार प्रकल्पासाठी दिल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे संबंधित कंपनीने ही जमीन पोलिस बंदोबस्तामध्ये ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.ही जमीन कसणाऱ्या गायरानधारकांनी याला विरोध करीत आंदोलन सुरू केले आहे. मंगळवारी कंपनीच्या लोकांनी पोलिस बंदोबस्तात या जमिनीवर काम सुरू केले असता, आंदोलकांपैकी चार जणांनी याला विरोध करीत विष प्राशन केले. पोलिसांनी त्यांना तत्काळ उपचारासाठी अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल केले.यात बाळासाहेब शेषेराव हारे (वय ४८), माणिक विठोबा आगळे (वय ५५), विजय लिंबाजी कांबळे (वय ४२), पलंका रमेश तारळकर (वय ४०) यातील तीन जणांवर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉ. बिराजदार यांनी सांगितले.याबाबत तेथील ग्रामसेवक एस.बी. शिंदे यांना विचारले असता, या जमिनीबाबत महसूल प्रशासनाकडे अधिकार असल्याचे त्यांनी सांगितले. जवळगावच्या गायरानधारकांचे आंदोलन पोलिसांच्या बळावर चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप युवा आंदोलन संघटनेचे अशोक पालके यांनी केला आहे.

## मराठवाड्यात पाणीटंचाई

# तीन जिल्ह्यांना ८३ टँकरद्वारे पाणी पुरवठा



**छत्रपती संभाजीनगर दि. ९ :** मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड या तीन जिल्ह्यांतील ५७ गावे व ११ वाड्यांना ८३ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. टंचाई कृती आराखड्यामध्ये विभागातील सर्व जिल्ह्यांत टँकर सुरू करण्याचे नियोजन केल्याचे सूत्रांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील ८ गावे व ५ वाड्यांना १२ टँकरने पाणी पुरवठा होत आहे. यात फुलंब्रीतील १ गावात २ टँकर, पैठण तालुक्यातील ११ गावांना ११ टँकरद्वारे, वैजापूर तालुक्यातील १५ गावे व एका वाडीला १६ टँकरद्वारे तर गंगापूर तालुक्यातील तहानलेल्या ७ गावांना १० टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. जिल्ह्यातील ४२ गावे व ६ वाड्यांना ५१ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे. टँकरच्या मंजूर फेऱ्यांची संख्या १०१ आहे. ५६ खासगी विहिरींचे अधिग्रहण केले आहे.नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील एक व माहूर येथील एका गावाला टँकरने पाणी पुरवठा होत आहे. जालना जिल्ह्यातील १३ गावे व ५ वाड्यांना मिळून ३० टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे.

जालना तालुक्यातील ३ गावे व २ वाड्यांना १२ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे. बदनापूर तालुक्यातील ६ गावे व ३ वाड्यांना १२ टँकरने, अंबड तालुक्यातील ४ गावांना ६ टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे.

## सुरक्षा रक्षकांचे हात-पाय बांधून पवनचक्कीचे १३ लाखांचे साहित्य लांबविले

**केज दि. ९ :** दोन सुरक्षारक्षकांचे हात–पाय बांधून १३ लाखांचे पवनचक्कीचे साहित्य लांबविल्याची घटना केजमध्ये उघडकीस आली. ही घटना सोमवारी मध्यरात्री २.३० च्या सुमारास घडली. याप्रकरणी अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी, केज तालुक्यातील विडा येथे पवनचक्की उभारणीचे काम सुरु आहे. त्यामुळे या ठिकाणी अभिजित दुनघव व आकाश जाधव हे दोघे सुरक्षा रक्षक म्हणून काम करतात. सोमवारी मध्यरात्री २.३० च्या सुमारास हे दोघे घटनास्थळी झोपले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांचे हात–पाय बांधले.

# औट्रम घाटात चार बोगदे आणि रेल्वेमार्ग होणार

**छत्रपती संभाजीनगर दि. ९ :** सोलापूर–धुळे महामार्ग क्र. २४१ वरील कन्नड येथील औट्रम घाटात रेल्वे, ‘एनएचएआय’च्या माध्यमातून चार बोगदे बांधण्यास दिल्लीत झालेल्या बैठकीत निश्चित करण्यात आले. अर्धा–अर्धा खर्च वाटून घेऊन प्रकल्प पूर्ण करण्याच्या तत्त्वावर दोन्ही मंत्रालयांचे एकमत झाले.

दीड दशकापासून औट्रम घाटात बोगदा बांधण्याचा प्रकल्प अवास्तव खर्चामुळे रेंगाळला होता. आता केंद्रीय रेल्वे व दळणवळण मंत्रालयाच्या जॉइंट व्हेंचरशिपमध्ये हा प्रकल्प मार्गी लावण्याचे ठरले. यात ३५०० कोटी रेल्वे तर ३५०० एनएचएआय अशी तत्त्वत: मान्यता मंगळवारी दिल्लीत झालेल्या बैठकीत मिळाली. दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीस रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, खा. डॉ. भागवत कराड, उद्योजक राम भोगले, विवेक देशपांडे यांच्यासह दोन्ही मंत्रालयांतील वरिष्ठांसह गतिशक्तीचे संचालक व अधिकारी उपस्थित होते.औट्रम घाटामध्ये १५ किलोमीटर लांबीचे चार बोगदे बांधण्याचा प्रस्ताव आहे. त्यातील एका बोगद्यातून रेल्वे आणि दुसऱ्या बोगद्यातून राष्ट्रीय राजमार्ग धुळे–सोलापूरची वाहतूक जाईल. दोन बोगदे हे सुरक्षिततेसाठी राखीव असतील सध्या घाटामध्ये बोगदा नसल्याने ११० किलोमीटर अंतराचा फेरा मारून २२ हजार वाहने जात आहेत. येथे होणारी औद्योगिक गुंतवणूक लक्षात घेता, किर्लोस्कर व इतर नामांकित कंपन्याच्या भविष्यातील उत्पादनामुळे या महामार्गावरून तब्बल चाळीस हजार वाहनांची वाहतूक होईल.

बोगदा दक्षिण आणि उत्तर भारताला जोडण्यासाठी महत्त्वाचा राहील. मराठवाड्यातील औद्योगिक व दळणवळणासह देशाच्या दोन दिशांना जोडणारा हा मार्ग असेल. सोबतच छत्रपती संभाजीनगर ते चाळीसगाव, पुढे सोलापूरपर्यंतचा रेल्वेमार्ग कनेक्ट होईल. दळणवळणाचे मॅग्नेट तयार करणारे हे दोन मार्ग जवळपास मंजूर आहेत. डीपीआरसाठी दोन्ही मंत्रालये अर्धा–अर्धा खर्च करतील. काही महिन्यांत निविदा प्रक्रियेस सुरुवात होईल.१५ किलोमीटर लांबीचे तीन बोगदे बनविण्यासाठी रेल्वे आणि भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाच्या माध्यमातून भागीदारी तत्त्वावर प्रकल्प असेल. बोगद्याचा डीपीआर बनविण्यासंदर्भात दोन्ही मंत्र्यांनी त्यांच्या यंत्रणांना आदेश दिले. यामुळे चाळीसगाव रेल्वेचा मार्गही मोकळा झाला आहे.

## स्वच्छतेसाठी गावकरी संतप्त

# ग्रामपंचायतीच्या खुर्च्यांवर टाकला कचरा

**नेकनूर दि. ९ –** गावातील कचरा साफ होत नसल्याने नेकनूर मधील नागरिकांच्या संतापाचा उद्रेक झाला. संतप्त नागरिकांनी ग्रामपंचायतीच्या खुर्च्या आणि टेबलावर कचरा आणून टाकला. संतप्त नागरिकांनी सरपंचासह ग्रामसेवकांना धारेवर धरत जाब विचारला. आता ग्रामपंचायत किती दिवसात साफसफाई करते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

मोठ्या उत्पन्नाच्या ग्रामपंचायतीमध्ये सुविधांची वाणवा कायम आहे. मूलभूत सुविधा दिल्या जात नसल्याने गावात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. याकडे नेकनूर ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याने संतप्त नागरिकांनी ग्रामपंचायतीमध्येच कचरा आणून टेबल आणि खुर्च्यांवर टाकत आपला संताप व्यक्त केला. यामुळे काही काळ ग्रामपंचायतीमध्ये गोंधळ उडाला होता.गावातील स्वच्छतेकडे लक्ष देऊन कचऱ्याची विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. याकडे ग्रामपंचायत लवकरात लवकर पावले उचलते का याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

पाण्यासाठी अनेक भागात धावाधाव सुरू असून शिक्षक कॉलनी परिसरातील बोरवेल बंद पडल्याने शिवाय या भागात नळ योजना नसल्याने या नागरिकांना पाण्यासाठी भटकण्याची वेळ आली आहे. येथील नागरिकांनी टँकर देण्याची मागणी ग्रामपंचायतकडे केली आहे.


## देवगिरी किल्ल्यावर भीषण आग

# ऐतिहासिक वारशाला मोठा धोका

**छत्रपती संभाजीनगर दि. ९ :** दौलताबाद येथील ऐतिहासिक देवगिरी किल्ल्यावर भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या आगीत किल्ल्याच्या परिसरातील गवत, झाडे पूर्णपणे जळून खाक झाली असून, जीवसृष्टी आणि ऐतिहासिक वारशाला मोठा धोका निर्माण झाला आहे.ही आग खाली काला कोटमधून सुरू झाली. वाऱ्याच्या जोरामुळे आगीने क्षणार्धात उंचावर झेप घेतली आणि बालेकिल्ल्याने चारही बाजूंनी पेट घेतला. किल्ल्यावर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे बारादरीच्या छतावरील जुने लाकडी तुळे व सज्जेही आगीत भस्मसात होण्याची शक्यता असल्याची माहिती मिळाली आहे.

आग लागल्याचे वृत्त समजताच दौलताबाद पोलिस, भारतीय पुरातत्व विभाग आणि अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. मात्र, किल्ल्याचे उंचसखल आणि कठीण भौगोलिक रचनेमुळे अग्निशामक दलाचे बंब आगीच्या ठिकाणी पोहोचू शकले नाहीत. पुरातत्व विभागाकडे अंतर्गत फायर सेफ्टी सिस्टिम नसल्याने आणि उंचावर पाणी लिफ्ट करण्याची कोणतीही सोय नसल्याने आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलेले नाही. खांदुर्णी आणि किल्ला परिसरात लागलेल्या आगीने काही वेळातच भीषण रूप घेतले. सुकलेले गवत आणि सोसाट्याचा वारा यामुळे आग अधिक वेगाने पसरली. या आगीत किल्ल्यावर वास्तव्यास असलेले मोर, माकडं, लांडोर, इतर पक्षी व प्राणी घाबरून जवळील शेतांमध्ये धावताना दिसले. अनेक लहान प्राणी आणि जीवजंतू आगीत होरपळून नष्ट झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे.

अग्निशमन दलाला तात्काळ माहिती दिली गेली. मात्र, वाहनांना पोहोचण्यात अडथळे येत असल्याने स्थानिकांनी झाडांच्या फांद्या, पाण्याचे हंडे आदी साधनांचा वापर करत शर्तीचे प्रयत्न केले.दरवर्षी उन्हाळ्यात देवगिरी किल्ल्यावर आग लागण्याच्या घटना घडतात. मात्र, याकडे प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने अशा संकटांची पुनरावृत्ती होते. इतिहास अभ्यासकांच्या मते, अशा वारंवार लागणाऱ्या आगीमुळे किल्ल्यावरील पुरातन वास्तूंना मोठा धोका निर्माण झाला आहे. शासनाने वेळेवर योग्य उपाययोजना न केल्यास हा ऐतिहासिक वारसा नष्ट होण्याची शक्यता आहे.



# सिडको घरांच्या हस्तांतरासाठी पाच सदस्यीय समिती गठीत

**नांदेड दि. ९ :** शहरातील सिडको नवीन नांदेड प्रकल्पातील वाटप केलेली घरे बाँड पेपरवर विक्री केल्यानंतर मूळ मालकांच्या अनुपस्थितीत त्या घरांचे हस्तांतरण करण्यासाठी अभय योजना राबविणे तसेच इतर काही अनुषंगीक बाबींसंदर्भात शिफारशी शासनास सादर करण्यासाठी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.

सिडको वसाहतीअंतर्गत असलेल्या योजना क्रमांक १ ते ४ मधील बहुसंख्य घरधारक हे गेल्या अनेक वर्षांपूर्वी सिडकोतील मूळ घरधारकांकडून बाँडपेपरच्या आधारे घरे खरेदी केलेली आहेत. अनेकांनी अनेक वर्षांपूर्वी घरे घेतलेली असल्याने ही घरे मूळ घरधारकांच्या अनुपस्थितीत व बाँडपेपरचे आधारे घरे हस्तांतरीत करण्याची मागणी करण्यात येत होत होती.२००५ मध्ये सिडको प्रशासनाच्यावतीने मूळ घरधारकांच्या अनुपस्थितीत घरे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया काही दिवसांकरिता कार्यान्वित करण्यात आली होती. या योजनेचा काहीजणांना लाभ झाला आहे. मात्र, ही योजना फक्त काही दिवसांसाठी मर्यादित होती. अनेक घरधारकांनी ही योजना पुन्हा एकदा सुरू करण्यात यावी म्हणून विविध प्रकारचे आंदोलने केली.मात्र, सिडको प्रशासनाच्या वतीने बहुसंख्य घरधारकांच्या उपरोक्त मागणीला प्रतिसाद मिळाला नव्हता या भागातील नागरिकांच्या मागणीचा विचार करता मुंबई येथे याच विषयावर तत्कालीन पालकमंत्री, खा. अशोकराव चव्हाण यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती.

अखेर राज्य शासनाच्या नगर विकास विभागाचे सह सचिव सु.ना.शिंदे यांच्या स्वाक्षरीने सोमवारी ( दि.७) निर्गमित करण्यात आलेल्या आदेशात नमूद केले आहे की, नांदेड शहराच्या नियोजनबध्द विकासासाठी सिडकोची ''विशेष नियोजन प्राधिकरण'' म्हणून राज्य शासनाने दि.२६ सप्टेंबर १९७५ रोजीच्या अधिसूचनेन्वये नियुक्ती केली आहे. सिडकोने नांदेड प्रकल्पांतर्गत भौतिक, सामाजिक सुविधांसह आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटाकरिता चार गृहनिर्माण योजना राबविल्या असून त्याअंतर्गत एकूण ७ हजार ८८४ घरे बांधली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सदरील घरे ६० ते ९० वर्षाकरीता दिर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने ( लिजवर) लाभधारकांना देण्यात आलेली आहेत. तसेच ही घरे मुळ घर धारकांनी सिडकोची पुर्व परवानगी न घेता परस्पर पब्लीक नोटरी अथवा मुद्रांकावर खरेदी विक्रीचा व्यवहार करुन घराचा ताबा देखील खरेदीदारास दिलेला आहे. त्यानंतर सिडको संचालक मंडळाचा दि.२ मे २००५ ठराव क्र.९२०५ अन्वये नांदेड प्रकल्पास मुळ मालकाच्या अनुपस्थितीत अटी व शर्तीच्या अधीन राहून घरे हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सुमारे २७८ घरे हस्तांतरीत करण्यात आली आहेत. सदरील घरे अद्यापही खरेदीदाराच्या ताब्यात असून ती घरे सिडकोकडून हस्तांतरीत करुन मिळावीत अशी मागणी त्यांच्याकडून करण्यात येत आहे.सिडकोच्या नवीन नांदेड प्रकल्पातील वाटप केलेली घरे मूळ मालकांनी बाँड वर विक्री केल्यानंतर सदरची घरे हस्तांतरण करणे, या संदर्भात अभय योजना राबविणे तसेच इतर अनुषंगीक बाबींसंदर्भात शिफारशी शासनास सादर करण्यासाठी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.

### पाच सदस्यीय समिती शिफारशी सादर करणार

**समितीत अध्यक्ष - सह व्यवस्थापकीय संचालक ( सिडको ) सदस्य - जिल्हाधिकारी, नांदेड,सदस्य - आयुक्त, नांदेड - वाघाळा महानगरपालिका,सह व्यवस्थापकीय संचालक यांनी विषयाशी संबंधित तज्ञ व्यक्ती आणि छत्रपती संभाजीनगर येथील सिडकोचे मुख्य प्रशासक यांची सदस्य सचिव म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. दरम्यान,सदर समितीने या संदर्भात अभय योजना राबविणे तसेच इतर अनुषंगीक बाबींसंदर्भातील शिफारशी दोन महिन्यात सादर कराव्यात, असेही या आदेशात म्हटले आहे.**

## धावत्या बसला आग

# सुदैवाने सर्व ३५ प्रवासी सुखरूप

उमरी दि. ९ उमरीहून भोकरकडे जाणाऱ्या एसटी बसला अचानक आग लागली. यामुळे प्रवाशात एकच कल्लोळ माजला. चालकाने प्रसंगावधान राखून बस थांबविली व सर्व प्रवाशांना बाहेर काढले. त्यामुळे मोठी अप्रिय घटना टळली सर्व प्रवाशांचे प्राण वाचले. या आगीमध्ये बसचे मात्र नुकसान झाले आहे. ही घटना बुधवारी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास घडली.



उमरी - भोकर हायवे रस्त्यावरील जिरोणा गावाजवळ धावत्या बसच्या सायलेन्सर मधून अचानक धूर निघू लागला. यावेळी बस मध्ये ३० ते ३५ प्रवासी प्रवास करीत होते. अचानक घडलेल्या या घटनेमुळे प्रवाश्यांमध्ये एकच धांदल उडाली. प्रवाशांमध्ये आरडाओरड सुरू झाली. प्रसंगावधान राखून बस थांबविली. चालकांनी सर्व प्रवाशांना बाहेर काढले. त्यामुळे मोठी अप्रिय घटना टळली. या घटनेमध्ये कुणालाही इजा झाली नाही. चालक- वाहकांनी आग विझवली.याबाबत भोकरचे आगार प्रमुख संजय पुंडगे यांनी सांगितले की, बसच्या सायलेन्सरमधील बिघाडामुळे धूर निघाला. एसटी बसचे फारसे काही नुकसान झाले नाही. कुणालाही इजा पोहोचली नाही. घटना घडल्यानंतर सदर बसला टो करून भोकर आगारामध्ये आणण्यात आले.

## बिलोलीसह चार कृषि उत्पन्न बाजार समित्यांत

# शेतकरी भवन बांधण्यास मान्यता

**संदीप गायकवाड**

बिलोली, दि. ९ : शेतकरी बांधवांना मुक्कामाची सोय व्हावी यासाठी बिलोलीसह ४ कृषि उत्पन्न बाजार समित्यांत शेतकरी भवन बांधण्यास शासनाने मान्यता दिली आहे.




''राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन'' या योजनेंतर्गत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती असलेल्या ठिकाणी शेतकरी बांधवांना मुक्कामाची सोय व्हावी तसेच त्यांना मूलभूत सुविधा देखील त्याच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात.या दृष्टीने ज्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी भवन उपलब्ध नाही तेथे नवीन शेतकरी भवन बांधणे तसेच, ज्या बाजार समितीच्या परिसरात शेतकरी भवन अस्तित्वात आहे तथापि, सुस्थितीत नाही अशा ठिकाणी शेतकरी भवनाची दुरुस्ती करणे. यासाठी शासन अनुदान उपलब्ध करुन देते. सदर योजनेंतर्गत राज्यातील चार कृषि उत्पन्न बाजार समितींना नवीन शेतकरी भवन बांधण्याच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.यात कृषि उत्पन्न बाजार समिती, बिलोली, जि. नांदेड, कृषि उत्पन्न बाजार समिती, वडगाव, जि. कोल्हापूर, कृषि उत्पन्न बाजार समिती मुख्य बाजारपेठ वडीगोद्री, ता. अंबड जि. जालना व कृषि उत्पन्न बाजार समिती, सिरोंचा जि. गडचिरोली या चार बाजार समित्यांचा समावेश आहे.

बिलोलीच्या कृषि उत्पन्न बाजार समितीत शेतकरी भवन बांधण्यासाठी एक कोटी बावन्न लक्ष एक्याण्णव हजार नऊशे सत्तर रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

# उपकोषागार अधिकारी पदावर प्रविण पडलवार यांना पदोन्नती



**नांदेड, दि. ९ :** येथील जिल्हा कोषागार, कार्यालय येथील कर्मचारी प्रविण पडलवार यांची याच कार्यालयात उप कोषागार अधिकारी या पदावर पदोन्नती करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील सहसंचालक, (लेखा व कोषागारे) यांनी उपकोषागार अधिकारी पदाचे पदोन्नतीचे आदेश नुकतेच निर्गमित केले आहेत. त्यानुसार प्रविण पडलवार यांची पदोन्नती झाल्यामुळे जिल्हा कोषागार अधिकारी ज्योती बगाटे, पठाण, सिताफुले, शरद कपाळे, मेश्राम, जिल्हा हिवताप कार्यालयाचे अधिक्षक कैलास सावळे, सहाय्यक अधिक्षक विजय चव्हाण, हिवताप संघटनेचे पदाधिकारी व आरोग्य निरीक्षक सत्यजीत टिप्रेसवार, लिपिक बालाजी केंद्रे, पांडुरंग बोरकर, शेख खलील, सोमशेटवार, कैलास कुंटूरवार, राहुल सवाचमल यांच्यासह सर्व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## शर्थीचे प्रयत्न करूनही काळविटाचा मृत्यू

**मुखेड, दि.९ :** तालुक्यातील मोटरगा येथे जखमी अवस्थेत काळवीट आढळून आले आहे. या काळवीटास वाचविण्याचा कार्यकर्त्यांनी प्रयत्न केला मात्र शर्थीचे प्रयत्न करून ते निष्फळ ठरून शेवटी या काळविटाचा मृत्यू झाला.

बुधवारी, दि.९ रोजी दुपारी १२ वाजता मोटरगा येथील शेतकरी रमेश भिसे यांना त्यांच्या शेतात जखमी हरीण (काळवीट) दिसून आल्याने त्यांनी लगेचच मुखेड येथील विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे कार्यकर्ते विनोद रोडगे, अविनाश लालपलवाले यांना घेऊन पोलिस व वनविभाग विभागाला माहिती दिली. त्यानंतर संबंधित वन कर्मचारी व पोलिसांनी तातडीने मोटरगा येथे धाव घेऊन या काळविटाला जीवदान देण्याचा प्रयत्न केला परंतु असह्य उन्हामुळे त्याचा मृत्यू झाला.

# महापालिका करणार शहरात 'नो पार्किंग झोन'

**नांदेड, दि. ९ :** शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिका आणि वाहतूक शाखेकडून संयुक्त उपाययोजना केल्या जात आहेत. त्यानुसार शहरात पार्किंग झोन आणि नो पार्किंग झोन केले जाणार असल्याची माहिती महापालिकेचे आयुक्त डॉ महेशकुमार डोईफोडे यांनी दिली.

शहरातील बेशिस्त वाहतूक आणि पार्किंग झोनच्या अभावी वाहनचालकांकडून मुख्य रस्त्यावर बेशिस्तपणे लावली जाणारी वाहने यामुळे वाहतुकीचा खोळंबा ही नित्याची डोकेदुखी ठरलेली आहे. यावर वाहतूक पोलिस शाखा आणि महापालिका यांच्याकडून अपेक्षित उपाययोजना केल्या नसल्याने वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. यात भर म्हणजे शहरात कुठेही वाहनांसाठी पार्किंग झोन नसल्यामुळे रस्त्यात कुठेही वाहने उभी केली जातात.

'नो पार्किंग' मध्ये वाहन पार्क केल्यास ती उचलून वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी वाहतूक शाखेने दोन बोईंग व्हेकलची मागणी केली. महापालिकेने बोईंग व्हेकल खरेदीची प्रकिया देखील सुरू केल्याचे डॉ महेशकुमार डोईफोडे यांनी सांगितले. येत्या काही दिवसात नो पार्किंग झोनची अंमलबजाणी केली जाणार आहे . वाहतूक पोलिसांकडून नो पार्किंग झोन मधील वाहन उचलून कारवाई केली जाणार आहे.

# ट्रॅक्टर दुचाकी अपघातात विद्यार्थी ठार; दोघे गंभीर

**मुखेड दि. ९ :** तालुक्यातील चांडोळा गावाजवळ असलेल्या तळ्यातून माती घेऊन येणारा ट्रॅक्टर आणि संगणक क्लाससाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दुचाकीला भीषण अपघात होऊन यात एक विद्यार्थी जागेवर ठार झाला. तर इतर दोघांना डोक्यात जबर मार लागला असून पुढील उपचारासाठी त्यांना नांदेडला हलविण्यात आले आहे. ही घटना दिनांक ९ एप्रिल रोजी सकाळी ८.३० च्या दरम्यान घडली.

तालुक्यातील धनज गावातील मनीष राम वल्लेमवाड (१८), मारोती राजेश घोडके (१७), विवेक संतोष मानेकर ( २०) हे तिघे आज सकाळी एमएससीआयटी संगणक कोर्ससाठी आपल्या दुचाकीवरुन ( क्र. एमएच २६/२५८६) मुखेडकडे येत होते. त्याचवेळी चांडोळा गावा जवळील तलावातून काळी माती घेऊन एक ट्रॅक्टर ( क्र. एमएच २६ बीएक्स ३२७८) अचानक मुख्य रस्त्यावर आला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या दुचाकीची व ट्रॅक्टरची जोरदार धडक झाली. यात मनीष उर्फ मनोज राम वल्लेमवाड याच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने जागेवरच मृत्यू झाला. तर मारोती घोडके याचा डावा हात फ्रॅक्चर असून डोक्यात गंभीर दुखापत आहे. तसेच विवेक मानेकर यास डोक्यात गंभीर दुखापत झाली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचारानंतर दोघांना अधिक उपचारासाठी नांदेडला हलविण्यात आले.

## नगरपालिकेच्या लिपिकास धमकी

# कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी केले लेखणी बंद आंदोलन

**लोहा, दि. ९ :** येथील नगर परिषदेत लिपिक उल्हास रुपला राठोड यांना धमकी देत शिविगाळ करणाऱ्या आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या प्रकरणी लोहा नगर परिषदेतील कर्मचाऱ्यांनी या घटनेच्या निषेधार्थ दोन दिवस लेखणी बंद सुरु केले आहे. न. प. कर्मचारी उल्हास राठोड यास आरोपी मारोती व्यंकटी शेळके याने कार्यालयात येऊन शिविगाळ केली. व जिवे मारण्याची धमकी दिली. उल्हास राठोड यांच्या फिर्यादीवरून लोहा पोलिसांनी आरोपीविरुद्ध शिविगाळ व जिवे मारण्याची धमकी यासह शासकीय कामात अडथळा निर्माण केल्यावरून विविध कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## जिल्ह्यात पणन महासंघाच्या

# २१ केंद्रांवर केवळ ८८ क्विंटल तूर खरेदी

**नांदेड दि. ९ :** केंद्राच्या किमान हमी दरानुसार तूर विक्री करण्यासाठी जिल्ह्यात पणन महासंघाच्या २१ खरेदी केंद्रांवर केवळ ८८ क्विंटल तूर खरेदी झाली आहे. शेतकऱ्यांकडे नोंदणीसाठी सात-बारावर तुरीचा पेरा नसल्यामुळे तूर बाजारात विकावी लागली. अशीच स्थिती व्हीसीएमएफ तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या खरेदी केंद्राची असल्याची माहिती सूत्राने दिली.



जिल्ह्यात दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशनकडून बारा, विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन तसेच फार्मर प्रोड्यूसर कंपनीच्या या तीन यंत्रणेच्या माध्यमातून तूर खरेदी केंद्र सुरू आहेत. जिल्ह्यात ऑनलाइन नोंदणीला सुरुवात झाली. शेतकऱ्यांनी पीक पेरा नोंद असलेला सात-बारा, आधार कार्ड तसेच बँक पासबुकची झेरॉक्स घेऊन खरेदी केंद्रात नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले होते.त्यानुसार दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशनच्या २१ खरेदी केंद्रावर केवळ ३०० शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. यात किनवट ३०, गणेशपूर २०, हदगाव १०, मुक्रमाबाद ५३, जांब २१, रातोळी १८ अशी नोंदणी झाली आहे तर व्हीसीएमएफ व शेतकरी उत्पादक कंपनीच्या केंद्रावरही तुरळक नोंदणी झाली. पणनच्या १२ पैकी केवळ गणेशपूर १२ क्विंटल, तर वन्नाळी शहापूर येथे दोन अशा एकूण १४ शेतकऱ्यांची ८८.५० क्विंटल तूरीची खरेदी झाली आहे. यातील १४ शेतकऱ्यांना सहा लाख ६८ हजार १७५ रुपये अदा करण्यात आले आहे. गेल्या वर्षी तुरीला चांगला भाव मिळाला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने तुरीची लागवड केली. परंतु पणन महासंघाकडे रितसर पेरा नोंद केला गेला त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी आपली तूर खासगी व्यापाऱ्यांकडे विकली.

जिल्ह्यात हरभरा खरेदीचीही पणनच्या १२ शासकीय खरेदी केंद्रावर ऑनलाइन प्रक्रिया सुरू झाली आहे. शेतकरी या खरेदी केंद्रावर नोंदणी करत आहेत. परंतु बाजारात सध्या हरभऱ्याला सरासरी दर हमी दराप्रमाणे मिळत असल्याने शेतकरी बाजारात हरभरा विक्री करण्याला प्राधान्य देत आहेत.

## काचीगुडा ते हिसार विशेष रेल्वेला मुदतवाढ

नांदेड, दि. ९ : दक्षिण मध्य रेल्वेने काचीगुडा हिसार- काचीगुडा साप्ताहिक विशेष गाडीला मुदतवाढ देण्याचे ठरविले असून ही गाडी दि. १७ एप्रिल ते २९ जून, २०२५ दरम्यान २२ फेऱ्या पूर्ण करेल. ते पुढील प्रमाणे गाडी क्रमांक ०७७१७ काचीगुडा हिसार ही विशेष रेल्वे गाडी दि. १७ एप्रिल ते २६ जून , दरम्यान काचीगुडा येथून दर गुरुवारी दुपारी १६ वाजता सुटेल आणि निझामाबाद, नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, वडोदरा, रतलाम, सिकर, लोहारू मार्गे हिसार येथे शनिवारी दुपारी १४.०५ वाजता पोहोचेल. तसेच गाडी क्रमांक ०७७१८ हिसार - काचीगुडा ही विशेष रेल्वे गाडी दि. २० एप्रिल ते २९ जून दरम्यान हिसार येथून दर रविवारी रात्री २३.१५ वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच काचीगुडा येथे मंगळवारी रात्री २२.०० वाजता पोहोचेल, असे नांदेड रेल्वे विभागाच्या जनसंपर्क कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.



## विवाहेच्छुकांची पहिल्या भेटीसाठी

# कांदापोह्यांपेक्षा आता कॉफी डेटला जास्त पसंती

**नांदेड दि. ९ :** कधी काळी लग्न जुळवताना आई-वडिलांच्या पुढाकाराने घरात कांदापोह्याची बैठक होत असे. संकोचलेली नजर, आई-वडिलांची उपस्थिती आणि समोर गरमागरम कांदे पोहे. पण आता चित्र बदललंय आता पारंपरिक कांदापोह्यांच्या बैठकीला मागे सारत पहिल्या भेटीसाठी 'कॉफी डेट'ला पसंती देत आहे. त्यामुळे 'कॉफी हॉट, पोहे थंड' हे तरुणाईचं मत आता समाजात रूढीच्या चौकटी ओलांडून स्वतःचं स्थान निर्माण करत आहे.

डेटिंग ॲप्स आणि सोशल मिडिया यामुळे 'पहिली भेट' ही अधिक खुली आणि सुसंवादात्मक व्हावी, अशी अपेक्षा वाढत आहे. पूर्वी आई-वडील, नातेवाईकांच्या उपस्थितीत पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या बैठकीत दबाव असायचा, संकोच असायचा. पोह्याचा घास घेताना काय बोलावं, हेच समजत नसे. पण आता कॅफेमध्ये फक्त तू, मी आणि बिनधास्त संवाद... त्यामुळे समोरच्याला जाणून घेणंही सोपे जाते, असे तरुण सांगतात.बदलत्या काळाच्या ओघात विवाहपूर्व ओळखीच्या पद्धतीही नव्या वळणावर येत आहेत. मध्यंतरी यात नवा बदल बघायला मिळाला. जिथे पालक मुला- मुलींचा मनमोकळा संवाद व्हावा यासाठी त्यांना वेगळ्या खोलीत पाठवायचे. हा त्याकाळात बघण्याच्या कार्यक्रमात आलेला मोठा बदल होता. लग्न हे दोन व्यक्तींचं नव्हे, तर दोन कुटुंबांचं नातं असतं. आजच्या काळात मुले मुली एकमेकांना कॉफी डेटवर बाहेर भेटून निर्णय घेतात. पण त्यात कुटुंबाची भूमिका बाजूला राहते. मुला-मुलींना वेळ द्यायची व्यवस्था अनेकदा पालक घरात करतात. त्यामुळे पारंपरिक आणि आधुनिकतेचा समतोल राखता येतो. कुटुंबीयांच्या सहभागाशिवाय घेतलेले निर्णय भविष्याला धोका ठरू शकतात, असे पालकांचे मत आहे.



आधुनिक काळात लग्नाआधी मुला-मुलींच्या परस्पर भेटी सामान्य झाल्या आहेत. आज पुरुषांप्रमाणेच आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या सशक्त झालेल्या महिलांमध्ये स्वतःचे निर्णय घेण्याचा आत्मविश्वास वाढला आहे. आज लग्नासाठी एकमेकांना समजून घेण्यासाठी अनेक मुलं मुली बाहेर भेटतात. ही नव्या विचारांसोबत चालणारी एक सशक्त पायरी ठरू लागली आहे.लग्न ठरवताना मुला-मुलींना एकमेकांना समजून घेण्यासाठी मोकळं वातावरण आणि वेळ मिळणं आवश्यक आहे. आज लग्न तुटण्याचे प्रकारही वाढले आहेत. अशात मुलामुलींनी एकमेकांना परस्पर भेटून समजून घ्यावे, असा विचार पसरत आहे. त्यामुळे आता आधी भेट, मगच कांद्यापोह्याचा कार्यक्रम हा नवा ट्रेंड ठरत आहे. कांद्यापोह्यांच्या पारंपरिक पद्धतीने दोन्ही कुटुंबांच्या उपस्थितीमुळे मुला-मुलींवर एक प्रकारचा ताण असतो. पण आजकाल अनेक तरुण कॉफी डेटच्या माध्यमातून जोडीदाराशी स्वतंत्रपणे बोलणे पसंत करतात. अशा भेटीत अपेक्षा, विचारसरणी, भविष्यातील दृष्टिकोन यावर मोकळेपणाने संवाद होतो.

## फुले - आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव

# भीम पहाटसह चार दिवस भरगच्च कार्यक्रम

**नांदेड, दि. ९ :** राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वंचित बहुजन आघाडी नांदेड उत्तरच्यावतीने शुक्रवार, दि.११ एप्रिल पासून फुले, आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून यानिमित्ताने भीम पहाटसह चार दिवस भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती भंते पयाबोधी थेरो आणि इंजि. प्रशांत इंगोले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती दिनी दि.११ एप्रिल रोजी या महोत्सवाला सुरुवात होणार आहे. महात्मा फुले पुतळा परिसर आयटीआय कॉर्नर येथे सायंकाळी ६ वाजता 'स्टार प्रवाह फेम' गायक प्रबुद्ध जाधव यांचा भीम गीतांचा तर दि. १२ एप्रिल रोजी रॅप गायक रॅपर विपिन तातड यांचा जयभीम कडक हा तसेच तिसऱ्या दिवशी दि.१३ एप्रिल रोजी सारेगमप फेम भाग्यश्री अभ्यंकर यांचा भीम गीतांचा कार्यक्रम होणार आहे. या महोत्सवात युगपुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी दि.१४ एप्रिल रोजी सकाळी ५ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात सुप्रसिद्ध भीमशाहीर राजू मोरे प्रस्तुत भीम पहाट या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.